बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरूवार,दि.२४ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक८१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


## माझी जनता माझ्या पाठीशी



### धनंजय मुंडे : परळीकरांशी धनंजय मुंडेनी साधला संवाद

बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील वर्षभरापासून अनेक मोठे लोक माझ्या मागे लागले असून माझे राजकीय अस्तित्व संपवण्यासाठी अभिमन्यू प्रमाणे मला चक्रव्यूहामध्ये गाठण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र अर्जुनाचेच दुसरे नाव असलेला मी धनंजय आहे; मी चक्रव्यूहात सापडणार नाही, माझ्या पाठीशी माझ्या जनतेचा आशीर्वाद आहे. जोपर्यंत माझ्या जनतेचा आशीर्वाद आणि प्रेम माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत माझा अभिमन्यू कोणीही करू शकत नाही असे उद्गार आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी बोलताना काढले आहेत.

परळी विधानसभा मतदारसंघात सह बीड जिल्ह्यातील विविध भागातील शिक्षण, नोकरी, व्यवसाय आदी कामानिमित्त छत्रपती संभाजी नगर व परिसरात राहणाऱ्या नागरिकांशी व विद्यार्थ्यांशी आज धनंजय मुंडे यांनी छत्रपती संभाजी नगर शहरातील लेमन ट्री हॉटेलमध्ये आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

मोठ्या शहरात विविध कामानिमित्त राहणारे विद्यार्थी व नागरिक आणि अडचणीच्या व संकटाच्या काळी मला हक्काने फोन करतात. त्यांच्या मदतीला मी तत्परतेने धावून जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु अडीअडचणीच्या व संकटाच्या काळी आपल्याला मदत करेल म्हणून धनंजय वर तुमचा जो विश्वास आहे, ते माझे भाग्य आहे आणि तो विश्वास मी कायम टिकवून पान २ वर...

# आघाडीच नाही, महायुतीतही जागांची बिघाडी

## पेच: किती जागांचा तिढा, दिल्लीतील नेता तोडगा काढणार




मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाविकासआघाडी आणि महायुती दोन्ही आघाड्यांमध्ये काही जागांचा तिढा अजून कायम आहे. महायुतीचे नेते उद्या दिल्लीत अमित शाह यांची भेट घेणार आहेत. उद्या उर्वरीत जागांवर निर्णय होईल. उद्या निर्णय करुनच येथून जाणार असल्याचं सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. आज एकत्र बैठक झाली. ज्यामध्ये २७० जागांवरच तोडगा निघालाय. त्यातही आतापर्यंत प्रत्येकाच्या वाट्याला ८५ जागा आल्यात. तर ११० जागांच्या अपेक्षा असलेल्या काँग्रेसला शंभरच्या आतच जागा मिळतील असं चित्र आहे. १८ जागा सोडून महाविकास आघाडीचं जागा वाटप जाहीर झालंय. एकूण २७० जागांवर महाविकास आघाडीत तोडगा निघाला आहे.दुसरीकडे महायुतीत देखील काही जागांचा तिढा कायम आहे. उद्या दिल्लीत अमित शाह यांच्या सोबत तिनही पक्षाच्या नेत्यांची बैठक होणार असून यामध्ये या जागांवर एकमताने निर्णय घेतला जाणार आहे. याबाबत बोलताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, ‘बाकी जागांवर चर्चा होऊन उद्या २८८ जागांचा तिढा सुटेल. आम्हाला काही जागांवर चर्चा करायची होती. उद्या अमित शाह यांची भेट घेऊन चर्चा करू. देवेंद्र फडणवीस, बावनकुळे हे देखील भेटीत असतील.’केंद्रीय नेतृत्वासोबत सगळ्यांनी एकत्र भेट घ्यावी हा माणस आहे. उद्या निर्णय करूनच आम्ही इथून जाणार आहोत. उद्या काही ठिकाणी आम्ही अर्ज भरण्यासाठी जाणार होतो मात्र या बैठकीमुळे तिकडे जाणार नाही. त्यांना इथूनच शुभेच्छा देतो. उद्या निर्णय अपेक्षित आहेच. तिघांनी एकत्र बसूनच निर्णय घेणे आवश्यक असल्याने आम्ही एकत्र बसणार आहोत. काल परवा मुख्यमंत्री व्यस्त होते, दादा व्यस्त होते, फडणवीस व्यस्त होते. त्यामुळं हा विषय सुटला नाही. हा निकडीचा विषय असल्याने आम्ही एकत्र आलो आहोत. असं ही ते म्हणाले. सुनील तटकरे म्हणाले की, ‘मेरिटवर निर्णय आम्ही घेणार आहोत. २८८ पैकी २६० जागांवर आमचं एकमत झालं आहे. मुख्यमंत्री पान २ वर...

# रत्नागिरीमध्ये वंचित उमेदवार देणार?

## रणधुमाळी:विद्यमान आमदारांना विधानसभा जडची शक्यता



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण विभागातील विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. प्रस्थापितांच्या विरोधात तळ ठोकून बसणार असल्याचे सांगण्यात येत आहे. असे झाल्यास या मतदार संघातील मतदानाची गणिते बदलण्याची आणि विद्यमान आमदारांना ही निवडणूक आणखीच जड जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.राज्यात वंचित बहुजन आघाडीने विविध अठरा पगड जाती-धर्माच्या उमेदवारांना वेळोवेळी संधी दिलेली आहे. यातच वंचित कडून आता रत्नागिरी दक्षिण भागात विधानसभेच्या तिन्ही जागांवर उमेदवार उतरवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी वंचितच्या दुसऱ्या उमेदवार यादीत दहा मुस्लीम उमेदवारांना संधी दिली आहे. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत ३० नवीन उमेदवारांचा समावेश आहे, ज्यात विविध जाती-जमातींच्या लोकांचा समावेश आहे. आतापर्यंत वंचितने एकूण ५१ उमेदवारांची नावे जाहीर केलेल्या या यादीत उमेदवारांच्या नावांसह त्यांच्या जातीचाही उल्लेख आहे करण्यात आला आहे. ज्यामुळे सर्वसमावेशक संघटना असल्याचे दिसून येऊ लागले आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागात देखील परिवर्तनवादी मतदार मोठ्या संख्येने आहे. दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यात सध्या राजापूर लांजातून शिवसेना ठाकरे गटाचे राजन साळवी, चिपळूणमधून राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे शेखर निकम, तर रत्नागिरीतून शिवसेना शिंदे गटाचे उदय सामंत असे तीन आमदार आहेत. यातील उदय सामंत हे शिवसेनेच्या फुटीनंतर शिंदे गटात सामील झाले. तर शेखर निकम पान २ वर...

# बांगलादेशमध्ये पुन्हा बेबंदशाही

## देशविदेश: आता राष्ट्रपतींच्या विरोधात आंदोलन



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

ीं: बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना हुसकावल्यानंतर आता राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांच्या निवासस्थानावर आंदोलक धडकले असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत.बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलक वंग भवनावर चाल करून आले आहेत. बांगलादेशमध्ये शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या भेदभावाच्या विरोधात विद्यार्थी संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या. या संघटनांनी नंतर पंतप्रधान शेख हसीना यांच्या घरावर चाल केली आणि त्यांना देशाबाहेर जाण्यास भाग पाडले. याच संघटना आता राष्ट्रपतींच्या विरोधात आक्रमक झाल्या असून ढाकामधील राष्ट्रपती भवनावर मोर्चा काढण्यात आला आहे. आंदोलकांनी पाच मागण्या केल्या असून राष्ट्रपतींनी राजीनामा द्यावा, पान २ वर...

# आयआयटीमध्ये विद्यार्थ्याचा हॉस्टेलमध्ये मृत्यू

## आत्महत्येचा संशय: हत्येची शक्यता पोलिसांनी फेटाळली!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

फेब्रुवारी महिन्यात एमटेकच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा हॉस्टेलच्या खोलीत संशयास्पद मृत्यू ओढवला होता. त्याच्या पालकांनी मुलाची हत्या झाल्याचा आरोप केला होता. आता दिल्लीच्या आयआयटी हॉस्टेलमध्ये पदव्युत्तर पदविकेच्या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा हॉस्टेलमधील त्याच्या खोलीत संशयास्पदरीत्या मृत्यू झाला आहे. यामुळे दिल्ली आयआयटीमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांना यात आत्महत्येचा संशय असून हत्येची शक्यता पोलिसांनी फेटाळून लावली आहे. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी त्यांना पोलीस स्थानकात दिल्ली आयआयटी



हॉस्टेलमध्ये एका विद्यार्थ्यानं आत्महत्या केल्याची माहिती देणारा फोन आला. हा विद्यार्थी झारखंडचा रहिवासी असून रात्री ११ च्या सुमारास पोलिसांना फोन आला होता. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. खोली आतल्या बाजूने बंद होती. पण या विद्यार्थ्याचे मित्र व आयआयटीच्या कर्मचाऱ्यांनी दरवाज्याची खिडकी तोडली आणि नंतर दरवाजा उघडून आत प्रवेश केला, अशी माहिती पोलिसांनी इंडियन एक्सप्रेसला दिली आहे.संबंधितांनी विद्यार्थ्याला तातडीने आयआयटी रुग्णालयात दाखल केलं. तिथल्या डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. तिथून त्याला सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आली. पण तिथल्या डॉक्टरांनीही त्याचा रुग्णालयात आणण्याआधीच पान २ वर...

# भगवान साकसमुद्रेंचा वाढदिवस उत्साहात

## ऋणानुबंध: पत्रकार संघाकडून उपक्रम



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

पत्रकार तथा फुले- आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे यांचा वाढदिवस शहरातील पत्रकारांच्या वतीने नुकताच साजरा करण्यात आला.

जेष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे व जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांच्या हस्ते दैनिक पुण्यभूमीचे प्रतिनिधी भगवान साकसमुद्रे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार धनंजय अरबुने, संघर्ष नेताचे संपादक मोहन व्हावळे, दैनिक रणझुंजारचे पत्रकार संतोष जुजगर, रणधुमाळीचे संपादक कैलास डुमणे, पान २ वर...

पडघम | राज ठाकरेंकडून सामाजिक कार्याची दखल

# गेवराईत मयुरी मस्के मनसेच्या उमेदवार

## पंडित-पवारांना मयुरीताई मस्के ठरणार तगड्या उमेदवार





**गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यात मयुरीताई मस्के-खेडकर व बाळासाहेब मस्के यांनी समाजसेवेतून एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. दरम्यान ते करत असलेल्या सामाजिक कार्याची दखल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी घेऊन गेवराई विधानसभेची उमेदवारी मयुरी मस्के यांना जाहीर केली आहे. मंगळवारी रात्री उशिरा मनसेने राज्यातील उमेदवारांची यादी जाहीर केली असून या पहिल्याच यादीत मयुरी मस्के यांचे नाव असून हि उमेदवारी जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान मयुरीताई यांना उमेदवारी जाहीर झाल्याने गेवराईतील प्रस्थापित पंडित-पवार यांना तगड्या उमेदवार ठरु शकतात अशी चर्चा होत आहे.**

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजलेला असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सध्या राज्यातील प्रमुख पक्षाकडून विधानसभानिहाय उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वबळावर विधानसभा निवडणूका



लढविण्याची घोषणा केलेली असून त्यांनी मंगळवारी रात्री उशिरा राज्यातील ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत गेवराई विधानसभेची उमेदवारी मयुरीताई मस्के यांना देण्यात आली आहे. दरम्यान मयुरीताई मस्के व बाळासाहेब मस्के यांनी समाजसेवेचा वसा हाती घेऊन पान २ वर...

# बर्गर खाल्ल्याने ४९ जणांना संसर्ग

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अमेरिकेत ई कोलाई या आजारामुळे ४९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी एकाचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मॅकडोनाल्डचा क्वार्टर पाऊंडर हमबर्गर खाल्ल्यानंतर नागरिकांमध्ये या आजाराची लक्षणे दिसत असल्याचं अमेरिकेच्या आरोग्य विभागाकडून सांगण्यात आलं आहे. अमेरिकेत जवळपास १० राज्यांमध्ये आजाराचा प्रादुर्भाव असल्याची माहिती आहे.मीडिया रिपोर्टनुसार, सप्टेंबर महिन्याच्या अखेरीसापासून नागरिकांना ई-कोलाई आजाराची लक्षणे दिसून येत आहेत. त्यापैकी अनेकांनी मॅकडोनाल्डचा क्वार्टर पाऊंडर हमबर्गर खाल्ल्याचे पुढे आलं आहे. ज्या नागरिकांना रुग्णालयात दाखल करण्यात



आलं, त्यात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंतचा समावेश आहे. यापैकी सर्वाधिक २७ प्रकरणं कोलोराडो भागात, तर ९ प्रकरणं नेब्रास्कामध्ये नोंदवण्यात आली आहेत.या घटनेनंतर अमेरिकेच्या सेंटर फॉर डिसीज कंट्रोल ॲण्ड प्रिवेंशन विभागाकडून तपास सुरू करण्यात आला आहे. क्वार्टर पाऊंडर हमबर्गरमधील सिल्वर ओनियन आणि बीफमुळे हा आजार होत असावा, असं प्राथमिक निरीक्षण या विभागाकडून नोंदवण्यात आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे याप्रकरणाचा तपास होईपर्यंत प्रभावित राज्यांमध्ये क्वार्टर पाऊंडर हमबर्गरच्या विक्रीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.अमेरिकेच्या डिसीज कंट्रोल ॲण्ड प्रिवेंशन विभागाकडून यासंदर्भात माहिती देण्यात आल्यानंतर मॅकडोनाल्ड्सचे सीईओ जो इर्लिंगर यांनीही प्रतिक्रिया देत नागरिकांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वोतोपरी असल्याचे म्हटलं आहे. तसेच या प्रकरणी आम्ही योग्य ती पावल उचलली असून तपास पूर्ण होईपर्यंत बर्गरमधील सिल्वर ओनियन आणि बीफचा वापर तात्पुरता स्थगित केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

संक्रमणानंतर साधारण तीन चार दिवसांनी या आजाराची लक्षणे दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने ताप येणे, उलट्या, घसा कोरडा पडणे, लघवी न येणे, चक्कर येणे या लक्षणांचा समावेश असतो. काही लोकांमध्ये किडनीची समस्याही उद्भवू शकते.

# निष्ठावंतांला न्याय देणे आवश्यक

## मागणी: जगदीश गुरखुदेंना भाजपचे जिल्हाध्यक्ष पद द्यावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील पंचवीस वर्षांपासून लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्याशी एकनिष्ठ राहून बीड जिल्ह्यात भाजप पक्षाची विचारधारा शहरी भागासह ग्रामीण भागात पोहोचण्यासाठी प्रामाणिकतेने काम करत पक्षाशी इमान राखत बीड नगरपालिकेत भाजपाचे एकमेव नगरसेवक म्हणून जनतेतून सलग तीन टर्म निवडून येण्याचा मान मिळवणारे व्यक्तीमत्व तथा भाजपचे बीड शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे यांना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी संधी द्यावी. त्यांच्या नियुक्तीतून प्रामाणिकपणे कोणत्याही अटीविना काम करणार्या प्रामाणिक आणि स्वाभिमानी कार्यकर्त्याला न्याय द्यावा अशी एकमुखी मागणी जिल्हाभरातील भाजप कार्यकर्त्यांतून होवू लागली आहे. लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांनीच आता आपल्या या निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी मिळवून देण्यासाठी पुढाकार घेवून पक्षश्रेष्ठीकडे विनंती करावी अशी मागणीही होत आहे.

बीड भाजप शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे हे सलग तीन टर्म बीड नगरपालिकेत नगरसेवक म्हणून बीड निवडून येत आहेत. भारतीय जनता पक्षाचे जाळे शहरासह ग्रामीण भागात विस्तारण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांच्या निस्वार्थी कार्याचे स्वतः लोकनेते कै. गोपीनाथराव मुंडे यांनी वारंवार कौतुक देखील केलेले आहे.जगदीश गुरखुदे यांनी भारतीय जनता पक्षासोबत काम करत असताना त्यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ दिला आहे, देत आहेत. सर्वसामान्य माणसांना पक्षाशी जोडणे, त्यांना सोबत घेणे आणि त्यांचे प्रश्न सोडवणे असे हातोटी असलेले जगदीश गुरखुदे हे सर्वसामान्यांच्या मदतीला जाऊन जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.कधी कोणाशी दुरावा नाही नाही, जो आपल्याकडे येईल त्याला होईल तितकी मदत करणे आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे गुरखुदे परिवाराचे वैशिष्ट्य आहे. मागील ३० वर्षांपासून बीडच्या समाजकारणात जगदीश गुरखुदे व त्यांचे बंधू परशुराम गुरखुदे हे सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. परशुराम गुरखुदे यांनी 'द्वारकाधीश' मित्र मंडळाच्या माध्यमातून बीड शहर आणि परिसरातील पंचक्रोशीत तरुणांचे संघटन निर्माण केले आहे. कुठल्याही अडला-नडल्या नागरिकांची कामे कामे करण्यासाठी हे बंधू धावून जातात. पुन्हा भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी म्हणून काम करताना त्यांनी कधीही आपल्यामुळे कोणी नाराज होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतलेली आहे. अशा सामाजिक कार्याचा अनुभव गाठीशी असलेले नगरसेवक जगदीश भाऊ गुरखुदे यांच्या रूपाने भारतीय जनता पक्षाची विचारधारा पुन्हा एकदा जिल्हाभरात सर्व दूर पोहोचवण्यासाठी त्यांना आता योग्यवेळी जिल्हाध्यक्ष पद देऊन न्याय द्यावा अशी मागणी सर्वसामान्य कार्यकर्त्यातून होत आहे. पक्षश्रेष्ठी आता गुरखुदे यांच्या बाबतीत काय निर्णय घेतात याकडे सर्वसामान्यांसह भाजप कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.



### शहराध्यक्षपदाची जबाबदारी समर्थपणे

भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असलेले जगदीश गुरखुदे यांना पक्षाकडून बीड शहराध्यक्ष म्हणून नवीन जबाबदारी दिली होती, ती जबाबदारीही जगदीश गुरखुदे यांनी समर्थपणे पेलली. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत अनेकांना आपलीशी करणारी आहे. म्हणूनच या सर्वमान्य नेतृत्वाला बीड जिल्ह्याचे नेतृत्व देण्याची मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

**एकनिष्ठ कार्यकर्त्याला न्याय द्यावा :** लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासोबत नगरसेवक जगदीश गुरखुदे यांनी अनेक वर्ष निष्ठावंत आणि निस्वार्थ कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. त्यानंतर लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे यांच्यासाठी ही गुरखुदे परिवाराने बीडमध्ये सातत्याने काम करत भाजपाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवली आहे. आता योग्यवेळी पंकजाताई मुंडे यांनी या सच्चा आणि प्रामाणिक कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदी संधी देऊन न्याय द्यावा अशी मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

---

## जनांचा प्रवाहो आटला

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत एका महत्त्वाच्या विषयावर भाष्य करणे लांबणीवर पडले. हा विषय काही राज्यांतील घसरत्या लोकसंख्येचा. त्यास तोंड प्रथम फोडले आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेस अधिकाधिक संतती प्रसवण्याचा सल्ला दिला. इतकेच नाही. ते एक पाऊल पुढे गेले आणि अधिक जननसंख्येसाठी कायदा करण्याची शक्यताही बोलवून दाखवते झाले. दुसऱ्याच दिवशी दक्षिणी नायडू यांच्या सुरात दुसरे दक्षिण राज्यीय मुख्यमंत्री तमिळनाडूचे एम. के. स्टालिन यांनी आपलाही सूर मिसळला आणि त्यांनीही लोकसंख्या वृद्धीची भाषा केली. नायडू यांच्याप्रमाणे तेही केवळ तेवढ्यावर थांबले नाहीत. प्रत्येक महिलेने किमान १६ अपत्ये प्रसवावीत, असा 'सो(व)ळा' सल्ला त्यांनी दिला. आता सोळाच का, बारा का नाही किंवा अधिक दोन अपत्ये जन्मास घालून दीड-डझनाचा हिशेब पुरा का करू नये, या प्रश्नांस उत्तरे नाहीत. खरे तर या प्रश्नांचीही गरज नाही. कारण मुळात मुद्दा अपत्यसंख्या हा नाही. तर जास्तीतजास्त अपत्ये जन्मास घालण्याची गरज या देशातील शहाण्या-सुरत्या मुख्यमंत्र्यांस वाटते, ते का; हा आहे. नायडू काय वा स्टालिन काय! हे काही कोणा धर्माची ध्वजा खांद्यावर घेऊन निघालेले कोणी भंपक बाबा/बापू नाहीत. नायडू हे तर एकेकाळी देशाचा 'आयटी'पुरुष असा लौकिक मिळवलेले. म्हणजे आधुनिक. तरीही त्यांना आपल्या राज्यात अधिक प्रजोत्पादन व्हावे असे वाटत असेल तर त्यांच्या मताची दखल घ्यायला हवी. त्यात त्यांना तमिळनाडूच्या प्रगत, निधर्मी इत्यादी मुख्यमंत्री स्टालिन यांनीही पाठिंबा दिल्याने या विषयावर ऊहापोह होणे अगत्याचे. या दोन मुख्यमंत्र्यांच्या विधानामागे राजकीय, प्रशासकीय ही कारणे उघड असली तरी घटत्या जननदरामागील वैयक्तिक तसेच सामाजिक कारणांसही स्पर्श करायला हवा.

प्रथम राजकीय मुद्द्याविषयी. त्याचा संबंध २०२६ साली पूर्ण होणे अपेक्षित असलेल्या जनगणनोत्तर मतदारसंघ पुनर्रचनेशी आहे. ही मतदारसंघ पुनर्रचना लोकसंख्याधारित असणे अपेक्षित. म्हणजे ज्या प्रदेशांची लोकसंख्या अधिक त्या प्रदेशास अधिक लोकप्रतिनिधी. या मुद्द्यावर दक्षिणेतील सुसंस्कृत, सुशिक्षित राज्ये नेहमीच उत्तर भारतीय राज्यांकडून मार खातात. उत्तर भारतीय राज्यांची आर्थिक प्रगती बेतासबात. पण ही राज्ये प्रजोत्पादनात उत्साही. दक्षिणेतील प्रगत राज्यांच्या तुलनेत उत्तरेचा जननदर जवळपास दुप्पट आहे. तेव्हा लोकसंख्याधारित मतदारसंघ पुनर्रचनेत उत्तरेकडील राज्यांचा लोकसभेतील टक्का वाढणार आणि त्या तुलनेत दक्षिणेचे प्रतिनिधित्व घटणार. ही संख्या विविध अंदाजांनुसार २३ ते ३५ अशी असू शकेल. म्हणजे इतक्या संख्येने दक्षिणेतील राज्यांतून लोकसभेत पाठवल्या जाणाऱ्या खासदारांची संख्या कमी होईल. हे एक वेळ ठीक. पण त्याच वेळी उत्तरेतील राज्यांतून लोकसभेत प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारांच्या संख्येत मात्र सणसणीत वाढ होईल. म्हणजे शक्यता ही की अवघ्या चार हिंदी भाषक राज्यांतूनच एकूण संख्येच्या जवळपास ६० टक्के लोकप्रतिनिधी संसदेत पाठवले जातील. याचा अर्थ ही चार राज्ये उर्वरित देशाच्या डोक्यावर सहजी मिऱ्या वाटू लागतील. कोणा राजकीय पक्षाने ही चार राज्ये 'काबीज' केली की पुरे. साऱ्या देशाचे नेतृत्व त्यास करता येईल.हे अर्थातच दक्षिणेस मान्य नाही आणि त्यांचा विरोध अत्यंत रास्तच ठरतो. जर व्यवस्थाच सुधारणावादी, प्रगतिशील समाजास गौरवण्याऐवजी दंडित करत असेल तर त्या व्यवस्थेस विरोध करायला हवा. त्याप्रमाणे दक्षिणी राज्यांतून हा नाराजीचा सूर अपेक्षेप्रमाणे ऐकू येऊ लागला आहे. त्यांचा विरोध केवळ या प्रतिनिधी-संख्या मुद्द्यापुरताच मर्यादित नाही. तो आर्थिक दाने-अनुदाने यांच्याशीही निगडित आहे. केंद्रास मिळणाऱ्या कराचे विविध राज्यांत वाटप कसे केले जावे याचे सूत्र ठरवून देणाऱ्या विद्यामान वित्त आयोगानेही कर विभागणीसाठी लोकसंख्या हा एक निकष सुचवलेला आहे. म्हणजे ज्या राज्यांची लोकसंख्या कमी त्या राज्यांस केंद्रीय करांचा वाटा कमी. अर्थातच तो अधिक लोकसंख्येच्या राज्यांस अधिक हे ओघाने आलेच. म्हणजे त्या आघाडीवरही प्रगतिशील, कुटुंबनियोजनी दक्षिणी राज्यांच्या पदरात पडणारा महसूल कमी होणार. हे दुहेरी नुकसान. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणात यश आले त्याबद्दल उत्तेजनाऐवजी या राज्यांस नुकसानच सहन करावे लागणार. तेव्हा नायडू आणि स्टालिन यांच्या कथित प्रक्षोभक विधानांमागील ही महत्त्वाची राजकीय कारणे. आता सामाजिक आणि वैयक्तिक मुद्द्यांबाबत.

आर्थिक प्रगती आणि त्यापाठोपाठ सांस्कृतिक सुबत्ता आली की त्या प्रदेशांतील महिला पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून अर्थार्जनास लागतात. 'मुलगी शिकली; प्रगती झाली' या घोषणेमागे ही वास्तवता आहे. तेव्हा अशा करिअरगामिनी माहिलांस अधिक पोरांचे लटांबर वाढवू नये, असे वाटणे साहजिक. हे अत्यंत योग्यच आणि स्वागतार्हदेखील. म्हणजे मग अशा समाजातील महिलांकडून जननदर कमी होणारच होणार. त्यात आता कुटुंबांचा आकारही आकसू लागलेला आहे. महिलांवर बहुतेकदा अन्याय करणारी आणि त्यांच्या भावभावना मारणारी एकत्र कुटुंब पद्धती दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे. तेही योग्यच. पती-पत्नी अर्थार्जन/ करिअरार्थी अधिकाधिक वेळ घराबाहेर घालवणार असतील तर बाळंतपणे नकोशीच वाटणार.

---

## पान एक वरून

**आघाडीच नाही, महायुतीतही...**कुडाळ दौऱ्यावर असल्याने ते उद्या येतील. आजची आमची नियोजित बैठक उद्या होईल.'भाजपने ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. शिंदे गटाने ४५ जागा तर अजित पवार गटाने ३८ उमेदवारांची घोषणा केली आहे. दुसरीकडे महाविकासआघाडीत ठाकरे गटाने ६५ उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने अजून यादी जाहीर केलेली नाही.

**माझी जनता माझ्या...** ठेवीन असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील व मराठवाड्याच्या इतर भागातीलही असंख्य विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या उत्साहात या कौटुंबिक स्नेह मेळाव्याला प्रचंड मोठ्या संख्येने हजेरी लावलेली पाहायला मिळाली. पुढील काही दिवसात विधानसभेची निवडणूक आहे, मी आज जो काही आहे तो तुमच्या प्रेम आशीर्वाद व मतदानाच्या जीवावर आहे. ज्याला तुम्ही उभे केले त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा अधिकार देखील तुम्हाला आहे, तो अधिकार तुम्ही इतर कुणालाही हिरावून घेऊ देणार नाहीत हा मला ठाम विश्वास आहे असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस व्ही जे एन टी विभागाचे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, अजय मुंडे, कन्नडचे नगराध्यक्ष संतोष कोल्हे, केंद्रे साहेब, प्राचार्य श्रीनिवास दराडे, सुरेश वानखेडे, संयोजक दत्ता भांगे, ज्ञानेश्वर ढाकणे, राजू सानप, वैजयंतीताई मिसाळ यांसह आदी उपस्थित होते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**रत्नागिरीमध्ये वंचित...**राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवार गटात सामील झाले. आमदार राजन साळवी हे ठाकरे गटात कायम आहेत. परंतु या तिन्ही आमदारांविरोधात त्यांच्याच मतदारसंघात नाराजीचा सुर मोठा आहे.या सर्वांना शह देण्यासाठी अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर हे वंचित आघाडीच्या माध्यमातून आपले मोहरे या विधानसभा निवडणुकीसाठी उतरवणार असल्याची दाट शक्यता आहे. यासाठी जिल्हा कमिटीवरील पदाधिकाऱ्यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात केल्याचे सांगण्यात येत आहे. यात जिल्ह्यात उमेदवारी लढवण्यासाठी इच्छुकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच अजूनही कोणी इच्छुक असल्यास येत्या चार दिवसात संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महासचिव मुकुंद सावंत यांनी केले आहे. मात्र वंचितने रत्नागिरी दक्षिण मधून उमेदवार उभे केल्यास विद्यमान राजकिय पक्षांतील उमेदवारांना याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. विद्यमान आमदारांना आता या वंचितची देखील धास्ती वाटू लागल्याची चर्चा आहे. तसेच वंचित आघाडीने आपले उमेदवार उभे केल्यास रत्नागिरीतील राजकीय गणिते देखील बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**बांगलादेशमध्ये पुन्हा ...**अशी एक मागणी केली आहेआंदोलकांनी मंगळवारी रात्री वंग भवनाकडे मोर्चा नेल्यानंतर लष्कराने तटबंदी उभारून मोर्चेकऱ्यांना अडवले. यानंतर आंदोलक एकत्र येऊन घोषणाबाजी करू लागले. यामध्ये राष्ट्रपतींनी राजीनामा द्यावा, अशाही घोषणा होत्या. राष्ट्रपती हे हसिना सरकारच्या जवळचे होते. त्यामुळे त्यांनी तात्काळ पदावरून पायउतार व्हावे, असे आंदोलकांचे म्हणणे आहे.मोहम्मद शहाबुद्दीन हे बांगलादेशचे १६ वे राष्ट्रपती आहेत. २०२३ साली राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत अवामी लिग पक्षाकडून त्यांचे नाव पुढे करण्यात आले आणि त्यांची बिनविरोध निवड झाली. भेदभाव विरोधी विद्यार्थी आंदोलनाने १९७२ साली लिहिलेले संविधान बदलून नवी घटना लिहिली जावी, असा आग्रह धरला आहे. याबरोबरच अवामी लिगच्या बांगलादेश छात्र लीग या संघटनेवर बंदी आणावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. तसेच शेख हसीना यांच्या नेतृत्वाखाली २०१४, २०१८ आणि २०२४ साली झालेल्या निवडणुका अवैध असून या निवडणुकांतून निवडून आलेल्या खासदारांना तात्काळ अपात्र ठरविण्यात यावे, अशी मागणी केली आहे. जुलै महिन्यात बांगलादेशमध्ये विद्यार्थी चळवळीने उग्र रुप धारण घेतले. सरकारी नोकरीमध्ये असलेल्या राखीव जागा काढून टाकण्यात याव्यात, अशी मागमी विद्यार्थ्यांनी केली होती. या आंदोलनानंतर ७६ वर्षीय शेख हसीना यांनी राजीनामा दिला आणि ५ ऑगस्ट रोजी बांगलादेशमधून काढता पाय घेतला आणि भारतात आश्रय घेतला. यानंतर ८ ऑगस्ट रोजी नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थान झाले.

**आयआयटीमध्ये विद्यार्थ्याचा**

मृत्यू झाल्याचा निर्वाळा दिला. सदर विद्यार्थ्याचा मृतदेह रुग्णालयात सुरक्षित ठेवण्यात आला असून त्याच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली आहे. त्याच्या खोलीचीही झडती घेण्यात आली आहे, अशी माहितीही संबंधित तपास अधिकाऱ्यांनी दिली.सदर विद्यार्थ्यानं त्याच दिवशी आयआयटी कॅम्पसमधील रुग्णालयात मानसिक तणावासंदर्भातले उपचार घेतले होते, अशी माहिती आता समोर येत आहे. आम्हाला त्याच्याजवळ किंवा हॉस्टेलच्या खोलीत कोणतीही सुसाईड नोट सापडली नाही. मृत विद्यार्थ्याच्या वैद्यकीय अहवालानुसार, तो मानसिक तणावाचे उपचार घेत होता. २२ ऑक्टोबर रोजी त्यानं यासाठी आयआयटी कॅम्पसमधील रुग्णालयात उपचार घेतले होते. तसेच, २९ तारखेची मानसोपचार तज्ज्ञांची अपॉइंटमेंटही त्यानं घेतली होती. त्याच्या मित्रांचे जबाब नोंदवण्यात आले असून हत्या वगैरे झाल्याची शक्यता नाही, असं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.

**आयआयटीकडून निवेदन जारी :** आयआयटी दिल्लीचे डीन बी. के. पाणीग्रही यांनी या घटनेनंतर निवेदन जारी केलं आहे. आपण सतत एकमेकांच्या मदतीसाठी तत्पर असायला हवं, हे अशा आव्हानात्मक वेळी पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. आमची विनंती आहे की जर तुम्हाला कोणताही तणाव जाणवत असेल, तर तुम्ही आपल्या व्यवस्थेमधील समुपदेशन केंद्राला भेट द्या, अशी प्रतिक्रिया डीन पाणीग्रही यांनी दिली आहे.

**भगवान साकसमुद्रेंचा वाढदिवस...**

मनसेचे नेते विठ्ठलराव झीलमेवाड, अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे,दैनिक महाभारत परळी प्रतिनिधी विकास वाघमारे, मराठवाडा साथीचे अनिल गायकवाड,नरसिंग अनलदास, आदर्श शिक्षक लक्ष्मण वैराळ , पत्रकार अमोल सुर्यवंशी आदि पत्रकार उपस्थित होते.उपस्थित पत्रकारांनी भगवान साकसमुद्रे यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

**गेवराईत मयुरी मस्के मनसेच्या**

तालुक्यात गोरगरीबांची सेवा करत पुण्याचे काम केलेले आहे. तसेच शेतकरी, कष्टकरी, सुशिक्षित बेरोजगार यांच्या प्रश्नांची जाणीव समोर ठेवून काम करत असलेल्या मस्के दाम्पत्यांची दस्तुरखुद्द मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांनी दखल घेऊन मयुरी मस्के यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे गेवराई विधानसभेत आता मयुरी मस्के यांनी पंडित-पवारांना आव्हान उभे केले असून तालुक्यात त्यांच्या उमेदवारीने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**राजसाहेब ठाकरे यांचा विश्वास सार्थकी लावणार-मयुरीताई मस्के :** मतदारसंघात मागील काही वर्षांत तन, मन, धनाने काम केले. गोरगरीबांच्या अडचणी तसेच त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने काम केले. दरम्यान या कार्याची दखल घेऊन राजसाहेब यांनी मला उमेदवारी देऊन विश्वास दाखवला. त्यामुळे राज साहेबांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास सार्थकी लावणार. तसेच मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी मार्गी लावण्यासाठी प्राधान्य देणार असून नवीन उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच महिलांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरोधात मी काम करणार आहे, असे मनसेच्या गेवराई विधानसभेच्या उमेदवार मयुरीताई मस्के यांनी सांगितले.

---

## पान सहा वरून

**अन्यथा जिल्ह्यात भाजपला**

मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, गायारान हक्क परिषद यांच्या माध्यमातून सर्व समाजाला आणि अठरा पगड जाती धर्माला न्याय देण्याचे काम करीत आहेत. पप्पू कागदे एक.प्रामाणिकणे गेल्या अनेक वर्षा पासून करीत आहेत.केज मतदार संघाचे सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची अनेक वर्षा पासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा असताना देखील त्यांना डावलले असल्याने मतदार संघात भाजप विरोधात लाट निर्माण झाली आहे.पप्पू कागदे यांच्या समर्थनार्थ केज रिपाइं कार्यकर्त्यांनी केज तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित केली होती. बैठकीला मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, राजेश सोनवणे, राहूल सरवदे, विकास अरकडे निलेश ढोबळे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे यांच्यासह हरेंद्र तुपारे दादाराव धेंडे, गोरोबा बनसोडे, गोरोबा बनसोडे, सूरज काळे, सुरेश गायकवाड, रोहित बचुटे, विनोद शिंदे, शिवाजी बनसोडे, हरीश गायकवाड, विनोद गायकवाड, रघुनाथ ढालमारे, रोहित कांबळे, मधुकर तुपारे, काकासाहेब कांबळे यांच्या तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.पप्पू कागदे हे जिल्ह्यातील सर्वसमावेशक आणि आश्वासक नेतृत्व असून ओपन, ओबीसी, दलीत, मुस्लिम प्रवर्गातील त्यांना मानणारा प्रचंड वर्ग आहे. त्याचा फायदा त्यांना मिळू शकतो.

**बीडची जागा फक्त**

प्रमुख सुनिल अनभुले यांनी माध्यमांना पत्रक प्रसिद्ध करून आपले मत व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे व त्यासाठी कामाला लागा असे सांगितले देखील आहे आणि आम्ही देखील सर्व शिवसैनिक अनिलदादा जगताप यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्यासाठी कामाला लागलो आहोत. अनिलदादा जगताप यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजय पक्का आहे व ते विक्रमी मतांनी निवडून येणार यात तिळमात्र शंका नाही असे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी पत्रकात म्हंटले आहे.

**परळीमध्ये अभिजित देशमुख**

म्हणून एन. के. देशमुख यांनी राबविले होते आता त्यांचाच सक्षम वारसा अभिजित दादा देशमुख पुढे नेतील याची खात्री मनसैनिकांना आहे.यासोबतच विविध व्यवसायाची पायाभरणी त्यांनी केली होती. आता त्यांचा सक्षम वारसा अभिजित दादा देशमुख समर्थपणे पुढे नेत आहेत. केरोसीन (रॉकेल) पुरवठा, एच पी पेट्रोल पंप, कायनेटीक व टिव्हीएस गाड्यांची डिलरशिप, सिएट व एम आर एफ टायरची एजन्सी, एक्साईड बॅटरीची एजन्सी, श्री व नाथ चित्र मंदिर (टॉकीज), हॉटेल अजंटा इंटरनॅशनल, हेल्थ क्लब, बांधकाम व्यवसाय, दूध डेयरी, महाराष्ट्र शेतकरी साखर कारखाना आदी व्यवसायांचा त्यांना अनुभव आहे. यातून हजारो जणांना रोजगार मिळालेले आहेत.उल्लेखनीय बाब म्हणजे ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या ओळखून जेमतेम तिशीत असताना त्यांनी सायखेडा येथे महाराष्ट्र शेतकरी साखर कारखान्याची पायाभरणी करण्याचे धाडस केले. कारखाना यशस्वीपणे चालवून हजारो शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दिलासा दिला. दुष्काळी किंवा अन्य कारणांमुळे मराठवाड्यातील अनेक कारखाने अडचणीत आले आणि बंद पडले. पण, अभिजित दादांचा वेगळेपणा इथेच कळतो की त्यांनी स्वतःपेक्षा शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत कारखाना एका अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित केला पण एका अटीवर की शेतकऱ्यांचे हीत लक्षात काही झाले तरी कारखाना चालूच राहिला पाहिजे. यातून अभिजित दादांची सामान्य जनांप्रति असलेली तळमळ दिसते. सोबतच अनेक गरजूंना विविध प्रकारे अभिजित दादा कोणताही गाजावाजा न करता मदत करत असतात. करोना काळात सर्व जग बंदिस्त झालेले असताना गरजू लोकांना ग्रामीण भागात जाऊन त्यांनी मदत केली पण कुठेही वाच्यता केली नाही अशा भावना मनसैनिक व्यक्त करत आहेत.

**विखे-पाटील यांचा मास्टर**

मत करणारा असा शब्द देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना विवेक भैय्या कोल्हे व स्नेहलता कोल्हे यांनी दिली असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहे शिर्डी विधान मतदारसंघात राधाकृष्ण विखे पाटील यांना सोपा जाण्याचे काही चित्र बघायास मिळत आहेशिर्डी विधानसभा मधील गणेश नगर पट्टयातील गावे हे एका मताने भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राधाकृष्ण विखे पाटील यांना पाठिंबा देतील असे आश्वासन कोल्हे गटाने दिल्याने विखे पाटील कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह भरल्याचे दिसून येत आहे तसेच डॉ सुजय विखे पाटील संगमनेर मधून उमेदवारी करण्याचा निश्चय केला असून त्यामुळे काँग्रेसचे थोरात व घोगरे यांना जड जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे कोल्हे गटाचा पाठिंबा मिळविण्यास विखे पाटील यांना यश आल्याने काँग्रेस कार्यकर्त्यात मात्र धावाधाव सुरू झाली आहे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मध्यस्थीने देशाचे गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली असल्याचे समजते

**पालक मंत्र्यांच्या परळीत दिवाळी**

आंदोलनाला २३ दिवस होऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने दि.२३ पासून आंदोलकांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी बुधवारी आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबा शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. तद्नंतर पत्रकारांशी संवाद साधत असताना ते म्हणाले की, बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या कृपाशीर्वादाने परळी मतदारसंघात आणि बीड जिल्ह्यात सर्वात गैरकारभार आणि भ्रष्टाचाराचे साम्राज्य फोफावले आहे. सिरसाळा ही सर्वात मोठी ग्रामपंचायत असून, पालकमंत्री सदरील ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात असल्याचा अनेकवेळा दावा करतात. मात्र गोरगरीब कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावू शकत नाहीत याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्यास गोरगरिबांची दिवाळी अंधारात होणार का? असा थेट सवाल राजेभाऊ फड यांनी प्रशासनासमोर निर्माण केला आहे. कर्मचाऱ्यांचा प्रश्न निकाली लागेपर्यंत आमचा त्यांना पाठिंबा असल्याचेही आश्वासन त्यांनी दिले.

**भीमराव धोंडे निवडणूक रिंगणात**

अशोक सवासे,माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड, लालाभाऊ कुमकर, ड, शेख, बाबुराव कदम, पाडुरंग गावडे, राजेश धोंडे, सदस्य रामराव खेडकर, बाळासाहेब पवार,ड. रत्नदिप निकाळजे, रिपाइंचे अशोक साळवे, शंकर देशमुख, बाबा ससाणे, धायगुडे, चंद्रशेखर साके, दादा जगताप, रघुनाथ कांदे आदि मान्यवर उपस्थित होते.

**निवडणूक यंत्रणेचा विभाग**

५४७ आहे. इतर मतदार तीन आहेत. दिव्यांग मतदारांची संख्या १७६८ आहे. नव मतदार ७६४१ आहेत.मतदान केंद्रावर १७८० अधिकारी कार्यरत राहणार आहेत. अन्य कामासाठी ५७० कर्मचारी कार्यरत ठेवण्यात आलेत. मतमोजणी गढी ता. गेवराई येथील नवोदय विद्यालयात पार पडणार आहे. दरम्यान, गेवराई विधानसभेच्या निवडणुकी साठी, निवडणूक यंत्रणा पूर्णत: सज्ज झाली आहे. निवडणूक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व उमेदवार आणि मतदार नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ यांनी केले आहे.

**ज्ञानसागरचा सांस्कृतिक**

महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्याचे व वाढवण्याचे काम अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलेचा वारसा जपून स्वतः चे कौशल्य विकसित करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कुलकर्णी व राजेंद्र चांदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल देशमुख, अमन शेख, संतोष बागलाने, संतोष बोराटे, रामदास काकडे यांनी परिश्रम घेतले. मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

**पक्षातील दोन दिग्गत**

पवार यांच्याशी बोलणी सुरू असल्याचे बोलले जात आहे. मात्र त्याला किती यश येते त्यावरच या दोन्ही माजी आमदारातील उमेदवारीचा प्रश्न सुटणार आहे. या विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचा उमेदवार जाहीर होणे अजून बाकी आहे. या मतदारसंघातून विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार सुरेश धस, आणि माजी आमदार साहेबराव दरेकर ही ही निवडणूक लढवण्यास उत्सुक आहेत. मात्र ही जागा महायुतीच्या कोणत्या पक्षाला मिळते त्यावरून महाविकास आघाडीचा कोण उमेदवार असणार हे ठरणार आहे. ही जागा जर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडेच राहिली तर भाजपच्या दोन्ही माजी आमदारांना कोणाचा झेंडा घ्यायचा की अपक्ष लढवायचे हा प्रश्न समोर निर्माण होणार आहे. त्यामुळे तूर्तास तरी कोणाचा झेंडा घेऊ हाती अशी म्हणण्याची वेळ या दोन्ही आमदारावर सध्या तरी दिसत आहे.

**वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी**

निर्णय झाला नाही. राज्यातील शासकीय वसतिगृहातीलवसतिगृह अधीक्षक दोघांनाही समान काम असताना वेतनश्रेणी वेगळी हा दिव्यांग निवासी शाळेच्या वसतिगृह अधीक्षकांवर हा अन्याय असल्याने समान काम समान वेतन या शासनाच्या धोरणानुसार शासकीय वसतिगृह अधीक्षकांप्रमाणे वेतन देण्यासाठी दिव्यांग निवासी शाळेच्या वसतिगृह अधीक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करावी यासाठी दिव्यांग शाळेतील वसतिगृह अधिक्षकांच्या संघटनेने मुंबई उच्च न्यायालयात औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. दोन्ही बाजूच्या युक्तिवादा नंतर न्यायालयाने दिव्यांग शाळेतील वसतिगृह अधिक्षकांच्या वेतनदुरुस्तीचा प्रस्ताव आयुक्तांनी एक महिन्यात वेतनत्रुटी समितीस सादर करावा व समितीने प्रस्ताव पाच आठवड्यात निकाली काढावा असे आदेश दिले आहेत. आता तरी वेतनदुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागेल अशी अपेक्षा वसतिगृह अधीक्षक संघटनेचे प्रविण अवसरमोल यांनी व्यक्त केली आहे.

संपादक : बाळासाहेब भगवान मस्के, कार्यकारी संपादक : सुनिल मसू डोंगरे

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# राहुरी बसस्थानकात हात की सफाई

## भयभित — पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी अहिल्यानगर जिल्हातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राहुरी बसस्थान परिसरात पाकीट मारी महिलांच्या गळ्यातील दागिने पर्स इत्यादी मोलवान वस्तू वर चोरट्यांचा टोळी कडुन हात की सफाई करुन लुटण्याचे प्रमाण वाढले असुन बस स्थानक चोरट्यांचा उपद्रवाने असुरक्षित बनले आहे

राहुरी ते अहिल्यानगर दरम्यान एसटी बसमधून प्रवास करत असलेल्या एका महिलेचे सुमारे तीन तोळ्याचे दागीने, मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल अज्ञात भामट्या महिलांनी चोरुन नेल्याची घटना दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी घडलीअनिता दत्तात्रय जाधव, वय ३७ वर्षे, या अहिल्यानगर येथील बोल्हेगाव, येथे राहतात. त्या कामानिमित्त राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे आल्या होत्या. दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजे दरम्यान अनिता जाधव या राहुरी बस स्थानक येथून अहिल्यानगर येथे जाण्यासाठी एसटी बसमधून प्रवास करत होत्या. त्यावेळी त्यांनी त्यांच्याकडील एक राणीहार, डोरले, कानातील



झुबे, मनी मंगळसुत्र, मोबाईल व रोख रक्कम असा एकुण मुद्देमाल पर्समध्ये ठेवून पर्स कपड्याच्या पिशवीमध्ये ठेवली होती. एसटी बसमधील गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात भामट्या महिलांनी अनिता जाधव यांची सोन्याचे दागीने असलेली पर्स चोरुन नेली. काही वेळातच पर्स चोरी गेल्याचे अनिता जाधव यांच्या लक्षात आले. घटनेनंतर अनिता दत्तात्रय जाधव यांनी राहुरी पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. १०८९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे

### बसस्थानकात पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी

राहुरी बसथानक येथे मोठ्या प्रमाणावर चोरी होण्याचे प्रमाण वाढले असुन चोरट्यांचा उपद्रवाने प्रवाशांना असुरक्षितता वाटत आहे दिवाळीच्या सणाला बस स्थानकात महिला व इतर प्रवाशांच्या संख्येत वाढ होणार असल्याने त्यांचा सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी प्रवाशी व काही सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांनी केली आहे

# सोयगावमध्ये पोलिसांचा रुटमार्च

**प्रशासन:** निवडणुकीमुळे सोयगाव पोलीस अलर्ट



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह हद्दीतील आमखेडा, गलवाडा आदी गावात बुधवरी दुपारी दोन वाजता सीमा सुरक्षादलाच्या जवानांसह सोयगाव पोलिसांनी रूट मार्च केला दरम्यान शहरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली आहे त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे

शहरातील जुना बाजार चौक,सोनार गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्थानक,रामजी नगर,आमराई,आमखेडा, गलवाडा,या परिसरात बुधवारी दुपारी दोन वाजता रूट मार्च हाती घेण्यात आला पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या नेतृत्वाखाली सीमा सुरक्षा दलाच्या एका तुकडी सह सोयगाव पोलिसांनी हा रूट मार्च केला यावेळी शहरात शांतता पसरली होती दरम्यान आचारसंहितेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार होवू नये त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे सोयगाव सह तालुक्यात निवडणुका शांततेत व्हाव्यात यासाठी हा रूट मार्च घेण्यात आला आहे.

# स्वप्नील गलधरांना उमेदवारी जाहीर करावी

**अनिल भोसले:** चळवळीत काम करणारे नेतृत्व

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टीची सत्ता असतांना तालुका अध्यक्ष असूनही या पदाला व सत्तेला फक्त मराठा आरक्षणासाठी राम राम ठोकणारा युवा नेतृत्व स्वप्नील भैय्या गलधर यांना गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षणाच्या चळवळीमध्ये व मराठा समाजाच्या विविध आंदोलनामध्ये सहभागी असतांना बीड वासियांनी पाहिल आहे.

मराठा आरक्षणासाठी भारतीय जनता पार्टीमध्ये राहून न्याय मिळत नसल्यामुळे एक वर्षापासून जरांगे पाटलांबरोबर प्रत्येक आंदोलनामध्ये सहभागी होऊन, अनेकांना अंगावर घेतले आहे. अशा युवकाला जरांगे पाटलांनी उमेदवारी देऊन तरुण नेतृत्वाला बीड विधानसभामध्ये नेतृत्व करण्याची संधी द्यावी.यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघ ही स्वप्नील भैय्या यांना बिन शर्त पाठिंबा देईल. स्वप्नील भैय्या यांचे मोठे बंधू कै.अमोल भैय्या गलधर यांनी मराठा महासंघामध्ये अनेक वर्ष मराठा आरक्षणाच्या बाबतीत लढण्यासाठी सक्रियता दर्शविली होती

# पिकविम्याच्या तक्रारींचे सर्वेक्षण पूर्ण

**नियोजन:** ३० हजार ऑनलाइन तर २५ हजार ऑफलाईन तक्रारी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सप्टेंबरमध्ये प्राप्त झालेल्या नुकसानीच्या पिकविम्या कंपनी कडे प्राप्त झालेल्या तीस हजार ऑनलाइन तक्रारी पैकी २२ हजार तक्रारींची पडताळणी करण्यात आली असून त्यातून ८हजार पाचशे तक्रारी फेटाळण्यात आल्या आहे त्यामुळे सप्टेंबरमध्ये नुकसान झालेल्या १३ हजार पाचशे शेतकरी पात्र असून ऑक्टोबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी च्या नुकसानीच्या २५ हजार तक्रारी प्राप्त असून त्यापैकी १४ हजार पाचशे तक्रारी ऑफ लाईन प्राप्त आहे ऑक्टोबर मधील नुकसानी च्या तक्रारींची पडताळणी बाकी आहे त्या आधी बुधवरी पीकविमा कंपनीच्या जिल्हा समन्वयक हेमंत शिंदे यांनी जरंडी व बनोटी मंडळात नुकसानीची पाहणी केली

सोयगाव तालुक्यातील सर्वच मंडळात सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले आहे.बनोटी आणि जरंडी या दोन मंडळात दोन वेळा ढगफुटी सदृश पाऊस झाला आहे त्यामुळे जरंडी च्या १८ आणि बनोटी च्या ४३ अशा ६१ गावांमध्ये नुकसानी ची दाहकता वाढली आहे महसूल च्या पाहणी नंतर बुधवरी



या दोन्ही मंडळात पीकविमा कंपनीचे जिल्हा समन्वयक हेमंत शिंदे यांच्यासह पथकांनी नुकसानीची पाहणी केली आहे दरम्यान गेल्या तीन दिवसा पासून नुकसानी च्या ७२ तासात तक्रारी करण्याचे पोर्टल बंद असल्याने तालुका कृषी विभागाने तातडीने ऑफ लाईन तक्रारी स्विकारण्याच्या सूचना पीकविमा कंपनीला दिल्या होत्या त्यामुळे रविवार ते बुधवार या चार दिवसांत १४ हजार५३८ ऑफ लाईन तक्रारी प्राप्त झालेल्या आहे.

# जीवनाला दिशा देण्याचे काम

**प्रा संजय इंगोले:** सरस्वती विद्यालयाचे घवघवीत यश

बीड/पुण्यभूमी प्रतिनीधी

सीएससी ओलंपियाड परीक्षेमध्ये सरस्वती विद्यालयाचे घवघवीत यश.

केंद्र शासन पुरस्कृत तसेच कॉमन सर्विस सेंटर म्हणजेच सीएससी मार्फत देश पातळीवर घेण्यात येणाऱ्या सीएससी ओलंपियाड या या परीक्षेमध्ये बीड शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले सदरील परीक्षेमध्ये चि. बागल अनुज विठ्ठल याने महाराष्ट्र झोनल लेवल रँक ५ वी पटकावत रोख दोन हजार रुपये शिष्यवृत्ती सुवर्णपदक व प्रमाणपत्र पटकावले तसेच शिंदे देवांश दिगंबर याने महाराष्ट्र झोनल लेवल रँक ११ तर कुठे वल्लभ गणेश याने महाराष्ट्र रँक लेवल १९ सुवर्णपदक व प्रमाणपत्र पटकावत प्रशालेची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. यावेळी सर्व यशस्वी विद्यार्थी व सन्माननीय पालक यांचा गुणगौरव करत सीएससी बीड जिल्हा व्यवस्थापक श्री दिनेश



जाधव सर तसेच ऑल इंडिया युथ फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष तथा कल्याणी कॉम्प्युटरचे संचालक श्री संजय इंगोले सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री गोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सन्माननीय पालक व गुणवंत विद्यार्थी यांचा सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. यावेळी प्रशालेतील विद्यार्थी पालक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# परतीच्या पावसाचा मोठा फटका

**अस्मानी:** पावसामुळे कापसाच्या झाल्या वात

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील आडुळ परिसरातील मागील पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीनंतर पुन्हा रविवारी रात्री धो धो पाऊस बरसला यामुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले असून रब्बी हंगामातील उगवणाऱ्या कोवळ्या शाळू ज्वारीलाही मोठा फटका बसला आहे. दरम्यान अतिवृष्टीच्या या नैसर्गिक संकटांमध्ये बळीराजा भांबावून गेला असून नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी शेतकरी करत आहे.

मागील आठवड्यात परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या पिकांचे नुकसान झाले असून अडुळ परिसरात वेळोवेळी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे कापसाच्या वाती झाल्या आहेत.पिकाला मोठा फटका बसला होता.यानंतर आता पुन्हा आलेल्या जोरदार पावसामुळे वेचणीला आलेल्या कपाशीच्या वाती झाल्या



आहेत. परिसरातील अनेक ठिकाणी कपाशीवर झाल्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे त्यामुळे एका वेचणीतच कपाशीचा खराटा होत आहे.खरीप हंगामावर मोठा खर्च करूनही पाहिजे तसे उत्पादन मिळत नसल्याने आता पेरणीचा खर्चही निघतो की नाही याची चिंता बळीराजाला लागली आहे.ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांवर हे नैसर्गिक संकट ओढवल्याने शेतकऱ्यांची दिवाळी काळोखात जाणार असल्याची चिन्हे दिसून आली आहे.शेतातील कापूस भिजल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे.यासोबतच रब्बी हंगामातील नव्याने उगवून आलेल्या शाळु ज्वारीचे कोवळे पीक पाण्यात डुबल्याने त्याचेही मोठे नुकसान झाले आहे.त्यामुळे शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# प्रा.अनंत केकान सन्मानित



तेलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील सरस्वती महाविद्यालयातील प्राध्यापक अनंत केकान यांची संभाजीनगर माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळावर सदस्य पदी नियुक्ती झाल्याने सरस्वती महाविद्यालयात त्यांचा विद्यार्थी आणि मित्र परिवाराकडून जंगी सत्कार करण्यात आला कर्मभूमीतील या सत्काराने केकान सर यांनी आजपर्यंत केलेल्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला. सरस्वती महाविद्यालयात गेल्या दोन दशकाहून अधिक काळापासून अध्यापन करणाऱ्या अनंत केकान हे एक कर्तव्यदक्ष विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून या भागात त्यांची ओळख आहे त्यांनी आजपर्यंत केलेल्या विद्याधानाची पावती म्हणून संभाजीनगर माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळावर त्यांची सदस्य पदी नियुक्ती झाल्याने तेलगाव चे शैक्षणिक स्तर उंचावले आहे. सामाजिक कार्यकर्ते गोरख सोनटक्के व त्यांच्या मित्रमंडळी आज महाविद्यालयात जाऊन केकान सरांचा येतो तिथे सन्मान केला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य वसंतराव शिंदे पर्यवेक्षक चवार सर, कंधारे, गुंजाळ, शिनगारे, अशोक राठोड, वाघमोडे, सोनवणे, अवचार, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ चव्हाण, राजू आडे, बंडू शिरसाठ, दत्ता वैद्य, बळीराम राऊत, महादेव कांबळे, प्रदीप सोनटक्के, संतोष माने, अविनाश खटके, पप्पू कांबळे उपस्थित होते.

# पिंपरखेडात आरोग्य विभागाची जनजागृती

**डॉ.उमेश करमाळकर :** नागरिकांना झाला मोठा फायदा

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपरखेड येथे जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष बीड व ग्रामीण रुग्णालय चिंचवणच्या वतीने येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमेश करमाळकर यांच्या पुढाकाराने जनजागृती शिबीर घेण्यात आले.

तालुक्यातील चिंचवण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने या भागात नेहमीच आरोग्य विषयक विविध कार्यक्रम घेण्यात येतात चिंचवन ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. श्री उमेश करमाळकर हे अत्यंत कर्तव्यदक्ष आरोग्य अधिकारी आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली चिंचवण ग्रामीण रुग्णालय आणि ग्रामीण भागात आरोग्य शिबीर राबवून वेळोवेळी जनजागृती होत असते. त्याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील पिंपरखेड येथे जनजागृती शिबिर घेण्यात आले. त्या शिबिराच्या अध्यक्ष स्थानी गावचे उपसरपंच तथा पत्रकार अशोक निपटे यांची उपस्थिती होती. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला उपस्थित होत्या. वैद्यकीय अधिक्षक



डॉ. श्री उमेश करमाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीटीसी चिंचवण अंतर्गत एच.आय. व्ही. संवेदिकरण व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी मार्गदर्शन करताना आय. सी. टी. सी. चे समुपदेशक श्री. प्रसाद ठोसर यांनी विविध आजारावर माहिती देऊन एच. आय. व्ही. व एड्स मधील फरक, तसेच टी. बी., एस. टी. आय. बद्दल मार्गदर्शन करून २०१७ च्या कायद्या विषयी देखील माहिती देऊन टोल फ्री न. १०९७ ची देखील माहिती दिली. यावेळी सर्व सदस्य आणि गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते. या वेळी आय. ई. सी. देखील वाटप करण्यात आले. या वेळी आरोग्य विभागाचे इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## संभाजी गायकवाड — महायुतीने पप्पूजी कागदेंना उमेदवारी द्यावी

# अन्यथा आम्ही सर्व उमेदवार पाडू

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा हा मतदार संघ राखीव आहे. या मतदार संघावर रिपाइंचा हक्क असतांना खुल्या प्रवर्गातील मुंदडा कुटुंबीय राखीव मतदार संघात अतिक्रमण करत आहे. रिपाइं युवक प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या मागे बीड जिल्ह्यातील अठरा पगड जातीतील समाज खंबीरपणे उभे आहेत. त्यांना महायुतीकडून केज राखीव मतदारसंघात उमेदवारी देण्याचे संकेत दिले होते. २०१९ मध्ये देखील उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते. मात्र तेव्हा त्यांना शेवटच्या क्षणात उमेदवारी नाकारल्याने आंबेडकरी जनता नाराज झाली होती. आता २०२४ ला देखील जाहीर आश्वासन देऊन पप्पूजी कागदे यांना उमेदवारी न दिल्याने आंबेडकरी जनतेचा



केजसह जिल्ह्यातील सहा महायुतीच्या उमेदवारांना पाडल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा टकारी समाजाचे नेते संभाजी



मारूती गायकवाड यांच्यासह आंबेडकरी जनतेने दिला आहे.

बीडमधील मेळाव्यात मंत्री रामदास आठवले यांनी बीड मधील उमेदवारी जाहिर केली होती. मात्र केज मतदान संघात पप्पुजी कागदे यांना जाणीवपूर्वक महायुती कडून डावलले जात आहे. राखीव जागेवर दलीत समाजाचा हक्क असताना खुला प्रवर्ग केज मतदार संघाचे नेतृत्व करत आहे. हा अन्याय आम्ही सहन करणार नाहीत. केज मतदार संघाची भाजपने नमिता मुंदडा यांना उमेदवारी जाहिर केल्याने बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनता नाराज झालेले आहे. आमचा उमेदवार नसले तर आम्ही महायुतीच्या विरोधात सर्व कार्यकर्ते काम करणार आहोत. असा इशारा टकारी समाजाचे नेते संभाजी मारूती गायकवाड यांच्यासह आंबेडकरी जनतेने दिला आहे. महायुतीने पप्पूजी कागदे यांना संधी द्यावी अशी मागणीही यावेळी त्यांनी केली.

# परतीच्या पावसाचे परिसरात थैमान!

**अस्मानी:** शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



केज /पुण्यभूमी प्नतिनिधी

केज तालुक्यात परतीच्या पावसाने थैमान मांडले आहे .मेघगर्जनेसह वीजांच्या कडकडटात धोधो पाऊस पडला यामुळे जनसामांन्य, शेतकरी यांचे फार नुकसान होउ लागले आहे. दि.२१/१०/२०२४ रोजी दुपारी १:३०वाजेच्या सुमारास काळेकुट्ट अभाळ आले ,सुसाट्याचा वारा वीजेच्या कडकडात पाउस जोरदार सुरु झाला. मौजे तरनळी येथे शेतीवर आधारीत जोडधंदा आसणारा व्यवसाय शेळीपालन ग्रामीण भागामध्ये केला जातो आशाच प्रकारे तरनळी येथील अभिमान सारुख हे आपल्या शेळ्या घेउन शेतात चारण्यासाठी गेले असता दुपारी वीज पडुन त्यांची दोन बकरे व एक शेळी यावर वीज कोसळुन जागीच मृत्यु झाला या घटनेने तरनळी गावात हळहळ व्यक्त होत आहे.शासना मार्फत त्यांना आर्थीक मदत मिळण्याचे आव्हान होतआहे.तसेच मौजे नाव्होली येथे खंडोबाच्या मंदीराजवळ आसणार्या ओड्याला पानी भरपुर आल्याने नांदुर केज जाणारा मुख्य रस्ता आर्धा तास ठप्प होता ,नांदुर केज बस पानी आसल्याने पावसात जाग्यावर उभी केली वाहतुक ठप्प झाली . प्रवाशाचे हाल झाले.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

लागवड

# खपली गहू लागवड कशी करावी?

**खपली गहू लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान**

**हवामान :**

खपली गव्हास रात्री थंड आणि दिवसा कोरडे हवामान लागते. जास्त पावसात खपली तग धरू शकत नाही. ढगाळ हवामानात किड व रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. खपली गव्हास वाढीच्या काळात साधारण १० अंश ते २३ अंश से. ग्रे. व दाणे भरण्याच्या अवस्थे मध्ये २५ अंश से. ग्रे. पेक्षा जास्त तापमान आवश्यक असते. तापमान थोडे वाढले तरी खपली गहू ते सहन करू शकतो.

**जमीन व पूर्वमशागत :**

खपली गहू काळया, कसदार व निच-याच्या जमिनीत चांगला येतो. तसेच हलक्या, क्षारपड व चोपण जमिनीमध्ये सुद्धा चांगले उत्पन्न मिळते. चांगल्या उत्पादनासाठी मातीचा सामू ६ ते ८ पर्यंत असावा. पिकाच्या उपयुक्त मुळया ६० ते ७५ सेंमी. खोलवर जात असल्यामुळे जमीन चांगली भुसभुशीत करून घ्यावी, त्याकरता खरीप हंगामात पिक काढणी झाल्यावर लोखंडी नांगराने किंवा ट्रक्टरने १५ ते २० सेंमी. खोलवर जमीन नांगरावी आणि ३ ते ४ वेळा वखराच्या पाळया द्याव्यात व जमिनीत असलेली आधीच्या पिकाची धसकटे व तण वेचून जमीन स्वच्छ करावी.

***खत व्यवस्थापन :***

हेक्टरी १० ते १२ टन शेणखत/कंपोस्ट खत प्रती हेक्टर कुळवाच्या पाळीने मिसळावे व जमीन पेरणीयोग्य करून घ्यावी. ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ४० किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. उर्वरित अर्धे नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी खुरपणीनंतर द्यावे.

**बियाणे व बीजप्रक्रिया :**

बियाणे म्हणून वापरताना खपली गहू टरफलासहीत वापरला जातो. १ हेक्टर पेरणीसाठी १०० किलो बियाणे वापरावे. टोकन पद्धतीने लागवड करण्यासाठी ४० ते ५० किलो बियाणे पुरेसे होते. पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन किंवा थायरम बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे याप्रमाणे बीज प्रक्रिया करावी तसेच २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर ₹ २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणा-या जीवाणुंची बीज प्रक्रिया गुळाच्या पाण्याबरोबर करावी, बियाणे सावलीमध्ये वाळवून पेरणी करावी.

आघारकर संशोधन संस्थेने २००९ साली एम.ए.सी.एस. २९७१ ही खपलीची अधिक उत्पन्न देणारी, बुटकी जात प्रसारीत केली आहे. या जातीच्या लागवडीची शिफारस महाराष्ट्र, कर्नाटक या भागासाठी वेळेवर पेरणीसाठी करण्यात आली आहे.

**पेरणीपूर्वी अशी करा उगवण क्षमतेची चाचणी :**

खपली गव्हाची पेरणीपूर्वी उगवण क्षमता तपासताना १०० दाणे ओल्या गोणपाटावर रांगेमध्ये ठेवावे व गोणपाट झाकून ठेवावे त्यास रोज सकाळी गोणपाट ओलसर होईपर्यंत पाणी मारावे. ४-५ दिवसांनी गोणपाट उघडून मोड आलेले दाणे/बिया मोजाव्यात व उगवण क्षमता ८५इ असल्यास बियाणे पेरणी साठी योग्य आहे असे समजावे.

**पेरणी :** पेरणीचे दोन ओळीतील अंतर २३ सें.मी. ठेवून करावी. बियाणे ५ से.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये, त्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता कमी होते. जमिनीमध्ये पुरेसा ओलावा/वापसा असताना पेरणी करावी. पेरणी शक्यतो दक्षिण-उत्तर दिशेने करावी त्यामुळे पिकास पुरेसा सूर्यप्रकाश मिळुन उत्पादनामध्ये वाढ होते. तसेच उभी आडवी पेरणी करू नये. पेरणी शक्यतो दोन चाड्याच्या पाभरीने किंवा सुधारित खते व बियाणे पेरणी यंत्राने करावी, म्हणजे पेरणी बरोबरच रासायनिक खते देखील देता येईल. पेरणी केल्यानंतर लगेच पाणी द्या त्यामुळे उगवण चांगली होते. टोकन पद्धतीत सरी वरंबा पद्धत वापरावी बियाणे टोकन करताना वरंबा उतारावर टोकन करावी.



**एकात्मिक तणनियंत्रण :**

पेन्डीमिथेलीन ३० टक्के ई.सी हे तणनाशक पेरणीनंतर लगेच २.५ लिटर प्रति/हे. ६०० ते ८०० लिटर पाण्यात मिसळून जमिनीत ओलावा असताना फवारावे. पिक २५-३० दिवसांचे झाल्यावर १ खुरपणी/कोळपणी करावी. खुरपणी शक्य नसेल तर रुंद पानाच्या तणांच्या नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० दिवसांनी २,४-डी सोडियम हे तणनाशक प्रति हेक्टरी १.२ किलो ६०० ते ८०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. तणनाशक जमिनीत पुरेसा ओलावा असताना फवारावे.

**पाण्याचे नियोजन :**

खपली गव्हास मुकुट मुळे फुटण्याची अवस्था (२१-२५ दिवस), फुटवे फुटण्याची अवस्था (३०-३५ दिवस), कांडी धरण्याची अवस्था (४०-४५ दिवस), पिक फुलावर असताना (६०-७० दिवस) आणि दाणे चिकात असताना (७५-८५ दिवस) अशा पिक वाढीच्या नाजूक अवस्थामध्ये पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. दाणे पक्व होण्याच्या अवस्थेत पिकास पाणी देऊ नये. त्यामुळे पिक लोळण्याची व बुरशीजन्य रोग येण्याची शक्यता असते, अशा लोळलेल्या पिकात उंदरांचा प्रादुर्भाव जास्त होतो.

**किड व रोग नियंत्रण :**

**मावा व तुडतुडे :** खपली गव्हामध्ये जास्तकरून मावा व तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडीचे नियंत्रणासाठी प्रादुर्भाव दिसुन आल्यावर ५इ निंबोळी अर्क २०० मि. ली. १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, प्रादुर्भाव जास्त असल्यास मिथाईल डिमेटॉन २५ टक्के प्रवाही ४०० मि.लि. किंवा थायामिथोक्झाम (२५ डब्ल्यू.जी.) ५० ग्रॅम किंवा ॲसिटामिप्रीड २५० ग्रॅम/ हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १५ दिवसानी वरीलप्रमाणे करावी. जैविक उपायांमध्ये व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझियम ॲनिसोफिली २५० ग्रॅम /हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळुन १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारावे.

**वाळवी :** वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी बांधावर असलेली वारूळे खणुन काढावित व त्यातील राणीचा नाश करावा. वारुळ नष्ट केल्या नंतर जमीन सपाट करावी व मध्यभागी सुमारे ३० से.मि. खोलवर एक छिद्र करावे आणि त्यात क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही हे किटकनाशक १५ मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळुन हे औषधाचे मिश्रण ५० लिटर एका वारुळासाठी या प्रमाणात वारुळात टाकावे किंवा क्विनॉलफॉस ५ इ दाणेदार किंवा कार्बोफ्युरॉन ३ इदाणेदार हेक्टरी २५ किलो जमिनीत टाकावे किंवा शेणखताबरोबर शेतात टाकावे. जमिनीमध्ये निंबोळी पेंड २०० किलो प्रति हेक्टरी टाकावी.

**रोग नियंत्रण :**

सुधारित खपली गहू वाण सहसा रोगास बळी पडत नाही त्यामुळे फवारणीची गरज भासत नाही. तरीपण बुरशीजन्य रोग आढळून आल्यास मॅन्कोझेब (डायथेन एम ४५) हे बुरशीनाशक २५ ग्रॅम, १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. काजळी किंवा काणी या रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशकाची बिज प्रक्रिया करावी, तसेच शेतातील रोगट झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत.

**उंदीर नियंत्रण :**

उंदरांचा बंदोबस्त करण्यासाठी विषयुक्त आमिषांचा वापर करावा. हे आमिष तयार करण्यासाठी वीघटक सौम्य विष तसेच झिंक फॉसस्फाईड वापरावे. प्रथम १०० ग्रॅम पिठामध्ये ५ ग्रॅम तेल व ५ ग्रॅम गुळ मिसळून त्याच्या गोळया २-३ दिवस उंदरांच्या येण्याजाण्याचा मार्गावर ठेवावे, त्यामुळे उंदरांना चटक लागेल. त्यानंतर वरीलप्रमाणे गोळया कराव्यात त्यात ३ ग्रॅम झिंक फॉस्फाईड टाकून, हातमोजे घालून किंवा काठीने मिश्रण करावे. पीठाच्या गोळया करून उंदरांच्या येण्याजाण्याचा मार्गावर ठेवाव्या जेणेकरून ते खाऊन उंदीर मरतील. मेलेले उंदीर पुरून टाकावेत. लोळलेल्या खपली मध्ये उंदीर प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. उंदरांचे प्रमाण जास्त आढळून असल्यास शेतात ४-५ पिंजरे प्रती एकर लावावेत. अधिक उत्पन्न व गुणवत्ता मिळवण्यासाठी खालीलप्रमाणे फवारण्या कराव्यात :खपली फुटवे फुटण्याच्या अवस्थेत असताना (३० दिवसांनी) १९:१९:१९ @ ७० ग्रॅम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. खपली दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना २% युरियाची फवारणी करावी.

खपली गव्हाची काढणी करताना खालील मुद्दे लक्षात घ्या :खपली कापणी करताना शक्यतो सकाळी करावी कारण सकाळी वातावरणात ओलावा असतो त्यामुळे ओंब्या गळून पडत नाहीत. दुपारी उन्हामध्ये तापमान वाढल्यास ओंब्या गळण्याची शक्यता जास्त असते. काढणी केल्यानंतर पेंड्या एक ते दोन दिवस उन्हामध्ये वाळवून मळणी यंत्राने मळणी करावी.

**संकलन - संजय गानोरकर**

## खपली गव्हाची वैशिष्ठे खालील प्रमाणे:

१) खपली गहू प्रामुख्याने पौष्टिक, वात-पित्तशामक, शक्ति वाढविणारा आहे.
२) खपली मधुमेह, हृदयविकार, आतड्यांचा कर्करोग, बद्धकोष्टता, हाडांची झीज भरून काढणारा, दातांच्या तक्रारी इत्यादी आजारांत आहारासाठी योग्य आहे.
३) खपली पचावयास हलकी आहे. शेवया, कुरडया, बोटुकली, खीर, रवा, पास्ता इ. पदार्थ बनवले जातात.
४) या गव्हापासून बनविलेली चपाती चवीला इतर सरबती जातीपेक्षा गोडसर असते.
५) या गव्हामध्ये १२ ते १५ टक्के प्रथिने, ७८ ते ८३ टक्के कर्बोदके आणि तंतूचे प्रमाण १६ टक्के आहे.
६) काळी, कसदार तसेच हलक्या, चोपण जमिनीमध्ये लागवड करता येते.

# हरभरा लागवड सुधारीत तंत्रज्ञान

**रब्बी हंगामात भारतीय कडधान्य वर्गामधील हरभरा या पिकास खूप महत्व आहे, कारण जगातील एकूण हरभ-याच्या पिकापैकी अंदाज ७८ टक्के पीक भारतात घेतले जाते. आपल्या देशातील हरभरा हे रब्बी हंगामातील प्रमुख कडधान्य पीक आहे. हरभरा हे रब्बी हंगामातील पीक असून या पिकास रात्रीचे आणि दिवसाचे तापमान अनुक्रमे १८ ते २६ अंश से. आणि २१ ते २९ अंश से. दरम्यान असल्यास पिकाची वाढ चांगली होते. प्रखर सुर्यप्रकाश असल्यास हे पीक जास्तीत जास्त उत्पादन देते. मंद ढगाळ वातावरणाबरोबर हवेत ओलाव्याचे जास्त प्रमाण असल्यास त्याचा फुलोऱ्यावर व दाणे भरण्याच्या म्हणजेच उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. अति आर्द्रता, हिवाळी पाऊस तथा गारपीट यांचा पिकाच्या वाढीवर गंभीर परिणाम होतो. ६.५ ते ८.५ सामू असलेल्या मध्यम ते भारी जमिनीत हे चांगले येते. हरभ-याच्या मुळावरील गाठींमुळे नत्राचे स्थिरीकरण जमीनीत होते. हरभ-याच्या टरफलासह दाण्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण १६ ते १९ टक्के असते तर नुसत्या डाळीत २२ ते २५ टक्के असते. तसेच हरभ-याच्या कोवळया पानात मॅलिक व ऑक्झॅलिक आम्ल असते.**

**जमिनीची निवड व पुर्वमशागतः** मध्यम ते भारी दर्जाची आणि चांगला निचरा होणारी जमिन निवडावी.चोपवन, निचरा न होणारी तसेच आम्ल जमिनीची निवड करू नये. जमिनीची कमीतकमी मशागत करावी त्यामुळे जमिनीतील ओल टिकण्यास मदत होईल. खरीप हंगामात मुगाचे -उडीदाचे पीक घेतले असल्यास ते पीक काढल्यानंतर जमीन २-३ वेळा वखरून तयार करावी.

**पेरणीची वेळः** जिरायतीखालील हरभर्याची पेरणी ऑक्टोबर च्या पहिल्या पंधरवड्यात पूर्ण करावी.ओलीतीखालील हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी. कबुली हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते जास्तीत जास्त १० नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी.हरभऱ्याचे फुलोऱ्याचा काळ थंडीत येईल आणि जितका काळ थंडीचा राहील त्याप्रमाणे उत्पादनात वाढ संभवते. या बाबीचा विचार करता पिकाची पेरणी १० नोव्हेंबरच्या आसपास करणे उपयुक्त असू शकते.

**बियाण्याचे प्रमाणः** देशी वाणाकरिता हेक्टरी बियाणे ७५-८० किलो प्रमाणे वापरावे. कबुली वाणाकरिता हेक्टरी बियाणे १००-११५ किलो प्रमाणे वापरावे.

हेक्टरी झाडांची संख्याः अधिक उत्पादनाच्या दृष्टीने झाडांची संख्या योग्य प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या पिकाकरीता दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व झाडातील अंतर १० सें.मी. ठेवावे याप्रमाणे दर हेक्टरी ३.३३ लाख झाडांची संख्या मिळते किंवा दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. व झाडातील अंतर १० सें.मी. ठेवावे याप्रमाणे दर हेक्टरी २.२२ लाख झाडांची संख्या मिळते.

**बिजप्रक्रियाः** बियाणे प्रक्रिया प्रमाण ३० किलो बियाण्यास रायझोबीयम - पी. एस. बी. कॉन्सरशिया २५० मिली ,प्लोक्लोरॅझ ५.७ टक्के तेब्युकोनाझॉल १.४ टक्के किंवा कार्बेन्डॅझिम २५ टक्के - मॅन्कोझेब ५० टक्के ०९ मिली ९० ग्राम , ट्रायकोडर्मा ३०० ग्राम. बिज प्रक्रिया करताना बियाणे जोरात घासू नये तसेच प्रथम बुरशी नाशकाची प्रक्रिया करून नंतर जीवाणू सवर्धकची प्रक्रिया करावी. जीवाणू सवर्धकची प्रक्रियाबियाण्यास पेरणीपूर्वी २-३ तास अगोदर लावून सावलीत वाळवावे.

**खतांची मात्राः** हरभऱ्याचे कोरडवाहू पीक घेण्यासाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद व ३० किलो पलाश प्रति हेक्टरी पेरणीच्या वेळी ओलीताखालील हरभऱ्याला द्यावे, त्याचप्रमाणे २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद व ४० किलो पलाश प्रति हेक्टरी कोरडवाहू हरभऱ्यास द्यावे. ओलीतीखालील हरभऱ्यासाठी खालीलप्रमाणे खताची मात्रा द्यावयाची झाल्यास खालील तत्त्याप्रमाणे द्यावी.

**ओलीतीखालील हरभऱ्यासाठी खते प्रती एकरप्रमाणे**

युरिया (११ किलो) - १०:२६:२६ (५० किलो) - सिंगल सुपर फॉस्फेट (४४ किलो) - गंधक ९० टक्के (८ किलो) - झिंक ३३टक्के (८ किलो) युरिया (१ किलो) - १२:३२:१६ (७५ किलो) - गंधक ९० टक्के (८ किलो) - झिंक ३३ टक्के (८ किलो) २०:२०:०० (५० किलो)- सिंगल सुपर फॉस्फेट (६३ किलो) - म्युरेट ऑफ पोटॅश (२० किलो) - झिंक ३३ टक्के (८ किलो) डी.ए.पी. १८:४६:०० (५० किलो) - युरिया (१ किलो) - म्युरेट ऑफ पोटॅश (२० किलो) - गंधक ९०टक्के (८ किलो) - झिंक ३३टक्के (८ किलो)

भारी जमिनीत नत्रयुक्त खतांचा जास्त वापर किंवा जास्त ओलीत झाल्यास पिकाची शाकीय वाढ भरपूर होते. परंतु भरपूर ओलावा असल्यास पिकाला ते लवकर उपलब्ध होऊ शकतात म्हणून नत्रयुक्त खते शिफारसीप्रमाणेच वापरावी.



**आंतरमशागतः** जमिनीत भेगा पडू नये म्हणून आवश्यकतेप्रमाणे १ ते २ कोळपण्या कराव्यात. त्याचप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे निंदणी करावी. हरभरा पिकात तण असल्यास उत्पन्नात फरक पडतो. हरभ-याच्या पिकाला पेरणीपासून पहिली निंदणी २५ दिवसांनी व दुसरी निंदणी ४५ दिवसांनी द्यावयाची शिफारस करण्यात आली आहे. पेरणीपासून ४५ दिवस तण नियंत्रण महत्वाचे आहे.

**तणनाशकाचा वापरः** तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास पेरणीपूर्व फ्ल्युक्लोरॅलिन ४५ टक्के ईसी १.७ ते २.२ लिटर प्रति हेक्टरी किंवा पेरणी केल्यानंतर ४८ तासांच्या आत म्हणजे उगवणपूर्व पेंडीमेथॅलिन ३०टक्के ईसी ३ ते ३.५ लिटर प्रति हेक्टरी वापरावे. हेक्टरी पाणी ६०० लिटर प्रमाणे घ्यावे.

ओलीत व्यवस्थापनः पहिली पाळी ५-१०इ फुलोरा असतांना द्यावे. दुसरी फुलोऱ्याचे रुपांतर घाट्यामध्ये झाल्यावर किंवा घाटे भरतांना द्यावे. ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त फुलोरा असतांना पाणी देऊ नये त्यामुळे फुलगळ होण्याची दाट शक्यता असते.


# हिवाळ्यात भाज्यांची लागवड करा आणि उत्पन्न वाढवा

भारतात शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे भारताची जगात कृषीप्रधान देश म्हणून ओळख आहे. देशातील शेतकरी पारंपरिक शेती न करता आता आधुनिक शेतीकडे वळले आहेत. बागायती पिकांचे क्षेत्र वाढत आहे. हिवाळ्यात भाजीपाला पिकांची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते.

भारतात पारंपारिक पिकांऐवजी बागायती पिकांखालील क्षेत्र वाढत आहे. आता लोकांच्या ताटातही धान्य कमी आणि भाज्या जास्त सजल्या आहेत. यामुळेच सरकार आता फळे आणि भाजीपाला यांसारख्या बागायती पिकांवर अधिक लक्ष देत आहे. शेती करून शेतकऱ्यांना कमी खर्चात चांगले उत्पन्नही मिळते.

सध्या देशभरात रब्बी पिकांच्या पेरणीला सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत साध्या भाज्यांऐवजी काही आरोग्यदायी भाज्यांची लागवड करून शेतकरी अधिक पैसे कमवू शकतात. अत्यंत कमी खर्चात बंपर उत्पादन देऊन हिवाळा संपेपर्यंत या भाज्या शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न देऊ शकतात. यातील काही भाज्यांची मागणी उन्हाळयापर्यंतही कायम आहे.

**कारल्याची लागवड :** हिरवा रंग कॅन्सर आणि मधुमेह यांसारख्या आजारांवर औषधाप्रमाणे काम करतो. हे एक सदाहरित पीक आहे, ज्याची लागवड कोणत्याही हंगामात करता येते. १ एकर शेतजमिनीत त्याची लागवड करण्यासाठी २० ते २५ हजार रुपये खर्च करावे लागतात, त्यानंतर शेतकरी दीड ते दोन लाखांचे उत्पन्न आरामात घेऊ शकतात. कडधान्य पद्धतीने १ एकरात कडबा पिकाची लागवड केल्यास ५० ते ६० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.



द्राक्षबागेतील इतर भाजीपाल्यांपेक्षा जास्त उत्पादन मिळते. हिवाळयापासून उन्हाळयापर्यंत त्याची मागणी कायम असते.

**मेथीची लागवड :** मेथीचे पराठे आणि मेथी की भुजिया हे हिवाळयातील प्रसिद्ध पदार्थांमध्ये शीर्षस्थानी आहेत. इतकंच नाही तर बरेच लोक ते वाळवतात आणि मसाला म्हणून वापरतात. याच्या बिया आणि पानांमध्ये लपलेल्या औषधी गुणधर्मामुळे त्याची मागणी वर्षभर राहते, मात्र त्याच्या लागवडीची योग्य वेळ ऑक्टोबर-नोव्हेंबर आहे.

ही भाजी उच्च रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलला ब्रेक देणारी आहे, जी शेतकऱ्यांसाठीही वरदान ठरू शकते. मेथीची पेरणी झाली की, शेतकरी ३ ते ४ वेळा कापणी करून उत्पादन मिळवू शकतो. तुम्हाला हवे असल्यास पारंपरिक पिकांबरोबरच मेथीची लागवड करून तुम्ही अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकता.

**हळद शेती :** क्वचितच असे कोणतेही स्वयंपाकघर असेल ज्यामध्ये हळद वापरली जात नसेल. हा आपल्या थाळीचा महत्त्वाचा भाग आहे, चव वाढवण्यासोबतच आरोग्य सुधारण्याचेही काम करतो. लोक ते एक चांगला मसाला म्हणून आणि विविध पदार्थांमध्ये वापरतात.

आज हळद आजीचा मुख्य घरगुती उपाय म्हणून प्रत्येक घरात प्रसिद्ध आहे. हळदीचा उपयोग अनेक प्रकारच्या संसर्ग आणि जखमांसाठी केला जातो. यासोबतच किडनी आणि लिव्हरसारख्या समस्यांमध्ये हळद संजीवनीप्रमाणे काम करते. ही भाजीपाला किंवा औषधी लागवड करून शेतकरी अधिक नफा कमवू शकतात.

**गाजर शेती :** गाजर बीटा-कॅरोटीनचा एक महत्त्वाचा स्रोत मानला जातो. हे केवळ दृष्टीच वाढवत नाही. उलट त्यामुळे त्वचा सुंदर आणि मुलायम देखील होते. हिवाळा सुरू झाला की हलव्यासाठी गाजरांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. शेतकऱ्यांना हवे असल्यास ते गाजराची आंतरशेती करून किंवा इतर पिकांसोबत गाजराची मिश्र लागवड करून गाजराचे चांगले उत्पादन घेऊ शकतात. गाजराची तण पद्धतीने पेरणी केल्यास खूप चांगले उत्पादन मिळते. विशेषतः पुसा रुधिरा आणि पुसा असिता या गाजराच्या जाती अल्पावधीत खूप चांगले उत्पादन देतात आणि आकर्षक पोतामुळे बाजारात विकल्या जातात.

**मोहरी हिरव्या भाज्यांची लागवड**

मोहरी हे रब्बी हंगाम २०२२ चे प्रमुख तेलबिया पीक आहे, परंतु लोक हिवाळयात मोहरीच्या हिरव्या भाज्या देखील मोठ्या उत्साहाने खातात. आम्ही तुम्हाला सांगतो की, मोहरी ही एक पालेभाजी आहे, जी हिवाळयात पिकवली जाते आणि खाल्ली जाते. शेतकऱ्यांना हवे असल्यास पुसा साग १, पुसा चेटकी, उन्हाळी लांब या जातींची पेरणी केल्यास कमी कष्टात चांगले उत्पादन मिळू शकते. सध्या बाजारात सरसों का सागचा पुरवठा कमी झाला आहे. अशा परिस्थितीत त्याची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते.

# करटुले भाजीतून लाखोंचे उत्पन्न

**करटुले ही एक दुर्मिळ रानभाजी आहे. मुख्यत्वे ही रानभाजी रानावनात आढळते त्यामुळे या भाजीत अनेक पौष्टिक घटक असतात. कटुरले वेलवर्गीय पीक आहे. या भाजीचा कालावधी हा जुलै ते सप्टेंबर या महिन्यांचा असतो. दरम्यान कटुरल्यांचे बियाणे आणि कंद उपलब्ध झाल्यामुळे आता शेतकरी या पिकाची लागवड करू शकणार आहेत. करटुल्यांची लागवड हलक्या ते मध्यम जमिनीवर करणे शक्य आहे यासाठी डोंगरउताराची किंवा पाण्याचा निचरा होणारी जमीन उत्तम मानली जाते. पिकासाठी उष्ण व दमट हवामान आवश्यक असते.**

करटुल्यांची लागवड साधारणतः ही मे महिन्याच्या शेवटी किंवा जून महिन्याच्या सुरुवातीला केली जाते. कटुरल्यांची लागवड कंद आणि बियाण्यांच्या साहाय्याने करता येते. कटुरले बियाण्यांच्या साहाय्याने लागवड केल्यास पहिल्या वर्षी पिकाची काळजी अधिक घ्यावी लागते. एकदाच करटुल्याची लागवड केल्या नंतर त्याची परत लागवड करावी लागत नाही. यात पिकाची कंदांचे विभाजन होऊन अनेक कंद निर्माण होतात. थेट कंदाच्या साहाय्याने लागवड केल्यास अधिक उत्पन्न मिळवता येते.

**अशी करावी लागवड -**

या पिकासाठी जमिनीत १.५ ते २ मीटर अंतरावर ६० सें.मी. रुंदीचे पाट तयार करावे. या पाटांच्या दोन्ही बाजूस १ मीटर अंतरावर ३० बाय ३० बाय ३० सें.मी. आकाराचे खड्डे करावेत. त्या प्रत्येक खड्ड्यात १.५ ते २ किलो कुजलेले शेणखत टाकून मातीत मिसळून घ्यावे. त्याचबरोबर १० ग्रॅम युरिया, ६० ग्रॅम सुपर फॉस्फेट, १० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश मातीबरोबर चांगले मिसळून घेऊन प्रत्येक खड्ड्यात एका कंदाची लागवड करावी. तसेच कंदाचे कुजण्याची प्रमाण कमी करण्यासाठी कंद कॉपर ऑक्सीक्लोराईडच्या २ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळलेल्या द्रावणात बुडवून घ्यावे लागतात.



**खताचे व्यवस्थापन-** प्रतिहेक्टरी उत्पादन घ्यायचे असल्यास २० टन शेणखत, १५० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ६० किलो पालाश या पिकाला द्यावे लागते. नत्र हे पिकाला वेळोवेळी द्यावे लागते जसे की लागवडीवेळी ५० किलो, लागवडीनंतर ३० दिवसांनी ५० किलो, आणि ६० दिवसांनी ५० किलो. शिवाय हे पिक एक महिन्याचं झाल्यावर प्रत्येक वेलास १०- १५ ग्रॅम युरिया देणे आवश्यक असते.

**आंतरमशागत** -

लागवडीनंतर हे वेल वेगाने वाढू लागतात. अशा वेळी वेलींच्या आळयांमध्ये मातीची भर टाकुन वेलींना आधार द्यावा. तसेच वेलाच्या आजूबाजूला उगवलेले गवत खुरपणी करून काढून टाकावे. बांबूच्या काठ्यांचा उपयोग करुन वेलींना आधार द्यावा.

**कटुरल्याचे प्रकार** - अंडाकृती आकाराचे कटुरले - या प्रकारात फळांचा रंग हिरवा असतो, आणि फळांवर मऊ काटे असतात. आकार अंडाकृती असतो. एका फळाचे वजन साधारणतः १० ते १२ ग्रॅम इतके असते.

**मध्यम गोल आकाराची कटुरले -**

या प्रकारात फळांचा रंग हिरवा, मध्यभागी फुगीर असून फळांवरील काटे टणक असतात. एका फळाचे सरासरी वजन १३ ते १५ ग्रॅम असते.

**मोठ्या आकाराची गोल कटुरले -**

या पद्धतीची कटुरले फिकट हिरवे असतात. यात बिया कमी प्रमाण कमी असते. हे सर्व प्रकार एकाच प्रजातीचे आहेत यात फक्त आकार भिन्नता असतो. यात आकाराने लहान असलेल्या कटुल्यांची मागणी जास्त आहे.

**कटुरल्याची वैशिष्ट्ये -**

कटुल्याचे फळे चवीला रूचकर असतात. या भाजीमळे पोट साफ होते आणि पित्ताचा त्रास कमी होण्यासाठी हे फार उपयुक्त आहे. यात कटुरले हे औषधी गुणधर्म युक्त भाजी आहे. तसेच अ आणि क जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असतात. या भाजीच्या गुणधर्मांमुळे कटुरले हे डोकेदुखी, केसगळती, खोकला, पोटदुखी, मूळव्याध, काविळ, डायबिटीज, कॅन्सर आणि उच्च रक्तदाब यासारख्या गंभीर आजारावर गुणकारी आहे.

# अन्यथा जिल्ह्यात भाजपला धडा शिकवू !

## बैठक केजची जागा पुनर्विचार करून पप्पू कागदेंना द्यावी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीने केजच्या जागे संदर्भात पुनर्विचार करून जागा रिपाइंचे नेते युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यात यावी. या मागणीसाठी रिपाइं कार्यकर्ते आक्रमक झाले असून जर पप्पू कागदे यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. तर भाजप आणि त्यांच्या उमेदवारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही. तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मुद्द्याला हरताळ फासणाऱ्या मुंदडा परिवाराला राजकारणातून हद्दपार करू. असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आणि भाजप आणि त्यांच्या नेत्या विरुद्ध प्रचंड आक्रोश व्यक्त केला आहे.

केज विधान सभेसाठी ना. रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा केलेली असताना देखील महायुतीने परस्पर उमेदवारी जाहीर करून मित्र पक्ष रिपांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा काम केले. या बाबत रिपाइं कार्यकर्त्यात प्रचंड प्रमाणात नाराजी आणि खदखद आहे. त्या निमित्त भाजपने त्यांच्या निर्णयाचा फेर विचार करावा अशी भावना व्यक्त केली. तसेच जर भाजपने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. तर जिल्ह्यात कमळ फुलणार नाही आणि फुलू देणार नाही. अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

पप्पू कागदे हे जनमानसातील नेतृत्व असून तळागाळातील सामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी ते धावून जातात. त्यांच्या माध्यमातून जिल्हा आणि राज्यात रिपाइंचे प्रचंड मोठी ताकद निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या मोर्चे सभा आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. पान २ वर...



### नमिता मुंदडांना निवडणूक जड जाणार

मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यात आमदार मुंदडा यांची भूमिका रिपाइंचे विरोध यामुळे मुंदडा आणि भाजपला जड जाणार असल्याची लक्षणे दिसून येत आहेत.

### कमळ हद्दपार करू कार्यकर्त्यांची भावना

बैठकीला जमलेल्या कार्यकर्त्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भाजपा आणि जिल्ह्यातील नेतांचा निषेध व्यक्त करून कमळ हद्दपार करू अशा भावना व्यक्त केल्या

### दलितांच्या प्रश्नावर आमदारांची भुमिका काय?

तालुक्यातील दलितांचे स्मशानभूमीचे प्रश्न, गायारान आणि मराठा व ओबीसी आरक्षण या बाबत त्यांची स्पष्ट भूमिका नसल्याने याचा त्यांच्या मतदानावर परिणाम होवू शकतो.

> भाजपने आम्हाला लोकसभा निवडणुकीच्या वेळी केजची जागा देण्याचे आश्वासन देवून ही आमच्या पाठीत खंजीर खुपसला. याचा बदला घेवून आम्ही मुंदडा यांना हद्दपार करू.
>
> – दिपक कांबळे,तालुका अध्यक्ष, केज

# बीडची जागा फक्त शिवसेनेचीच

## सुनिल अनभुले : एकनिष्ठ शिवसैनिकावर अन्याय करणार नाहीत



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. एकदा नव्हे तब्बल तीन वेळा शिवसेनेचा आमदार बीडकरांनी निवडुन दिला आहे. वर्षानुवर्षे बीड मतदार संघाची जागा शिवसेनेला सुटत आली आहे आणि ती यावेळेसही शिवसेनेलाच सुटणार आहे. तीन दशकांपेक्षा अधिक काळ मा. अनिलदादा जगताप हे बाळासाहेबांच्या विचारधारनेला प्रेरित होऊन संपूर्ण जिल्ह्याभरात शिवसेना पक्ष बांधणी करत आले आहेत. बीडला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यात अनिलदादांचे योगदान मोलाचे आहे आणि हे बीडकर देखील चांगलेच जाणून आहेत. आजवर शिवसेना आणि बाळासाहेब यांच्या विचार व धोरनावर ठाम राहणाऱ्या अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे आणि योगदानाची सर्वो परी माहिती तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांना आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे साहेब हे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक असणाऱ्या मा. अनिलदादा जगताप यांच्यावर अन्याय होऊ न देता अनिलदादांना न्याय देणार असा आम्हा शिवसैनिकांना पूर्णतः विश्वास असल्याचे बीड विधानसभा पान २ वर...

# परळीमध्ये अभिजित देशमुख मैदानात

## पडघम: मनसेकडून उमेदवारी जाहीर



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी महाराष्ट्र नवनिर्माण तर्फे परळी वैजनाथ मतदार संघात एन. के. देशमुख यांचे पुतणे उच्चविद्याविभूषित तसेच महत्वाकांक्षी उद्योजक असलेल्या अभिजित दादा देशमुख यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने २३ ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या उमेदवार यादीत मतदारसंघ क्र. २३३ परळी वैजनाथ येथे अभिजित दादांची उमेदवारी जाहीर होताच मनसैनिकांत उत्साह संचारला आहे. याबाबत बोलताना मायबाप जनता आणि राज ठाकरे साहेबांचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मनसैनिकांच्या सहाय्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असे प्रतिपादन अभिजित दादा देशमुख यांनी केले आहे.दैदिप्यमान कौटुंबिक वारसा, उत्तम संस्कार, विविध प्रकारच्या व्यवसायांचा अनुभव ते सुद्धा अगदी तरुणाईत असे रसायन असलेल्या अभिजीत दादा देशमुख यांना राज ठाकरेंनी आवर्जून प्राधान्य दिले आहे.

परळी वैजनाथचे यशस्वी नगराध्यक्ष असताना परळी वैजनाथ शहरात राष्ट्रमाता जिजामाता उद्यान, नटराज रंग मंदिर, महात्मा फुले भाजी मंडई, पक्के आणि मजबूत रस्ते, दररोज पाणी पुरवठा करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम योजना आदी उत्तमोत्तम उपक्रम यशस्वी नगराध्यक्ष पान २ वर...



# विखे-पाटील यांचा मास्टर स्टोक

## चर्चेतले: काँग्रेसचा रणनितीला लावला सुरूंग

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजप नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांची उमेदवारी भाजपचा वतीने जाहीर करण्यात आली पण काँग्रेसने त्यांचा विरोधात चक्रव्यू रचण्याचे प्रयत्न सुरू केले होते त्याला विखे पाटील यांनी मास्टर स्टोक देऊन शिर्डी विधानसभेचे चित्रच बदलून टाकले

कोपरगाव विधानसभा मधुन कोल्हे गटाचा गणेश नगर पट्ट्या मधील अनेक गावांमध्ये असणारा धबधबा हा विखे पाटलांना परवडणारा नव्हता राधाकृष्ण विखे पाटलांनी मास्टर टोक देऊन शिर्डी विधानसभेचे सूत्रच बदलून टाकल्याचे चित्र दिसून येत आहे येत्या विधानसभेला कोल्हे गट राधाकृष्ण विखे पाटील यांना सर्व ताकतीने पान २ वर...

# पालक मंत्र्यांच्या परळीत दिवाळी अंधारात!

## राजेभाऊ फड:ग्रामपंचायत आंदोलनास भेट

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील मौजे सिरसाळा ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत कार्यालयात काम करणाऱ्या कष्टकरी कर्मचाऱ्यांचे रुपये २८ लक्ष ०६ हजार ४०० रुपयांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून थकीत आहे. सणासुदीचे दिवस असल्याने थकीत वेतन देण्यात यावे या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग पत्करला असून २४ दिवस धरणे आंदोलन करूनही ग्रामपंचायत प्रशासनाने अथवा जिल्हा परिषदेने यावर काहीही तोडगा काढला नाही. आज बुधवारी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. कर्मचाऱ्यांच्या न्याय आणि हक्कासाठी आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने त्यांच्या खंबीरपणे पाठीशी आहोत असे आश्वासन युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिले.

सिरसाळा ग्रामपंचायत कर्मचारी मागील २४ दिवसांपासून थकीत वेतन देण्यात यावे या मागणीसाठी धरणे आंदोलन करीत आहेत. पान २ वर...



# भीमराव धोंडे निवडणूक रिंगणात उभा

## कठीण दिवस: अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

बहुचर्चित आष्टी-पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघातुन विधानसभा निवडणुकीसाठी मा. आ. भीमराव धोंडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कसलाही गाजावाजा न करता अगदी साध्या पद्धतीने मोजक्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वैशाली पाटील यांच्याकडे माजी आमदार धोंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी अजय धोंडे, माजी सभापती साहेबराव म्हस्के, अभय धोंडे, पांडुरंग नागरगोजे, दिलीप काळे, नियामत बेग, विठ्ठल बनसोडे, पान २ वर...

# निवडणुक यंत्रणेचा विभाग सज्ज

## रणधुमाळी :गेवराईत तीन लाख ७६ हजार ५४७ मतदार

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या गेवराई विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, मराठा-ओबीसी आरक्षणाच्या मुद्दयावर यंदाची निवडणूक लक्ष वेधी राहणार आहे. गेवराई विधानसभेच्या निवडणुकी साठी, निवडणुक यंत्राणा पूर्णत: सज्ज झाली आहे. निवडणुक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व उमेदवार आणि मतदार नागरीकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ यांनी केले आहे. दरम्यान, २२ ऑक्टोबर २०२४ रोजी, दिवसभरात ३५ उमेदवारांना ८८ अर्ज देण्यात आल्याची माहिती निवडणुक यंत्रणेकडून जाहीर करण्यात आली आहे. २९ ऑक्टोबर च्या दिवसा पर्यंत ११ ते ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे.



२२८-गेवराई मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सतीश धुमाळ भूसंपादन उप जिल्हाधिकारी कामकाज पाहत असून, संदीप खोमणे, तहसीलदार गेवराई विक्रम मांडूरके मुख्याधिकारी, गेवराई , श्रीमती वसुधा रहघाटे सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कार्यरत करण्यात आलेले आहे. २२८ - गेवराई मतदारसंघात एकूण मतदान केंद्राची एकूण संख्या४०४ आहे. त्यापैकी संवेदनशील बूथची संख्या ५० व ५१ आहेत. २२८ गेवराई मतदारसंघाचे आचार संहिता कक्ष तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आले आहे. त्या संदर्भात, एखाद्या उमेदवाराला काही अडचणी आल्यास त्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल. राजकीय कार्यक्रम घेणे करिता एक खिडकी अंतर्गत परवानगी कक्ष तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेला आहे.गेवराई मतदारसंघात एकुण स्त्री पुरूष मतदारांची संख्या तीन लाख ७६ हजार पान २ वर...

# ज्ञानसागरचा सांस्कृतिक कार्यक्रम




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी मुलांनी विविध देशभक्तीपर गीते, कोळीगीते, शेतकरी आत्महत्या, बेटी बचाव, शिवराज्याभिषेक, सर्व धर्म समभाव, आई-वडिलांचे महत्त्व, पोवाडा गायन, नाटिका, नृत्याविष्कार सादर केले. या कार्यक्रमास परीक्षक म्हणून कांता दोडके व मोहन घोडके यांनी काम पाहिले. आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंदाकिनी आहिरे होत्या. अध्यक्षस्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना विजय वाघमारे म्हणाले की, विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनन्य साधारण पान २ वर...

## रणधुमाळी धस, धोंडे समोर पेच निर्माण

# पक्षातील दोन दिग्गत नेत्यांसमोर प्रश्नचिन्ह

कडा/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बहुचर्चित असलेल्या आष्टी विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी मंत्री सुरेश धस यांच्यासमोर मोठा पेच निर्माण झाला असून, सध्या कोणत्या पक्षातून निवडणूक लढवायची यासंदर्भात एकाच पक्षातील दोन दिग्गत नेत्यांसमोर प्रश्नचिन्ह आहे. या दोन्हीही माजी आमदारांनी निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे. मात्र ही जागा कोणाच्या वाट्याला जाते त्यावरून या दोन्ही माजी आमदारांचे पक्ष ठरणार आहेत. राज्यात भारतीय जनता पार्टी शिवसेना एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांची युती आहे. या महायुतीने काही दिवसापूर्वी राज्यातील विधानसभा मतदारसंघातील पहिली यादी जाहीर केली. या यादीमध्ये बीड जिल्ह्यातील फक्त एका म्हणजे केज मतदार संघाचा समावेश होता. आष्टी मतदार संघावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी दावा सांगितला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट हा मतदारसंघ सोडण्यास तयार नाही. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी बाळासाहेब आजबे यांना पक्षाचा एबी फॉर्म दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांच्याकडे जाणार असल्याचे निश्चित झाले आहे.





बाळासाहेब आजबे यांच्या उमेदवारीमुळे भाजपचे माजी आमदार सुरेश धस आणि माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ही जागा भाजपाला सोडावी यासाठी भारतीय जनता पक्षाच्या महासचिव पंकजा मुंडे यांच्यामार्फत अजित पान २ वर...

# वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लागणार

## दिलासा: उच्च न्यायालयाने दिले आदेश

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

नांदेड दि. २३ दिव्यांग शाळेतील वसतीगृह अधिक्षकांच्या वेतनदुरुस्तीचा प्रस्ताव आयुक्तानी एक महिन्यात वेतनत्रुटी समितीस सादर करावा व समितीने प्रस्ताव पाच आठवड्यात निकाली काढावा असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. या आदेशामुळे दिव्यांग शाळेतील वसतीगृह अधिक्षकांच्या वेतनदुरुस्तीची मागणी लवकरच मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाल्याने दिव्यांग शाळेतील वसतिगृह अधिक्षकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.



राज्यात दिव्यांग शाळेतील वसतिगृह अधिक्षकांच्यी संख्या जवळपास ३६० आहे . संहितेनुसार ६ व्या वेतन आयोगात वसतिगृह अधीक्षकांना ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० मिळणे अपेक्षित असतांना ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० वेतनश्रेणी देण्यात आली या अन्यायाबाबत महाराष्ट्र राज्य अपंग शाळा कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक-गृहपाल महासंघाने शासनाकडे वेळोवेळी सातत्याने पाठपुरावा केला आहे. ७ व्या वेतन आयोगात १० अपेक्षित आहे. वसतिगृह अधिक्षकावर वेतनश्रेणी बाबत होत असलेला अन्याय वसतिगृह अधीक्षक संघटनेने शासना समोर ही मांडला आहे. शासनाने सातव्या आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटी निवारण समिती २०२४ ची स्थापना करीत दिव्यांग शाळेतील वसतीगृह अधिक्षकांच्या वेतनदुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश समाज कल्याण आयुक्तांना दिले होते मात्र अद्याप या बाबत सकारात्मक पान २ वर...